Chapter-1

# प्रकरण - 1

## गायकवाड घराण्याचा थोडक्यात इतिहास

### अ) मराठ्यांचा गुजरात प्रवेश :

गुजरातेत मराठी सत्तेची पायाभरणी मराठी साम्राज्याचे संस्थापक शिवाजीमहाराज यांनी केली. इ.स. 1664 साली शिवाजीमहाराज यांनी सुरत शहर लुटले. हाच मराठ्यांचा गुजरातशी आलेला पहिला संबंध होय. यात शिवाजीमहाराजांचा हेतू एकतर अचानक हल्ला करुन भरपूर लूट गोळा करायची, तसेच मोगल साम्राज्याचे वर्चस्व कमी करायचे असा होता. यानंतर इ.स. 1670 साली त्यांनी याच शहरावर दुसरी स्वारी केली. इ.स. 1672 साली सुरतेच्या दक्षिणेस असलेले पारनेरा व बागलाण हे किल्ले त्यांनी जिंकून घेतले व त्यांचे सेनापती मोरो त्रिंबक पिंगळे यांनी बागलाण मधील साल्हेरचा किल्ला काबीज केला. हा किल्ला गुजरातेतून दक्षिणेत येणाऱ्या मुख्य रस्त्यावर असल्याने, मराठयांना गुजरातवर आपला दरारा ठेवता येऊ लागला. तरी सुद्धा इ.स. 1699 पर्यंत मराठ्यांचा या प्रांताशी कायमचा संबंध प्रस्थापित झाला नाही. याच वर्षी सातारचे छत्रपती राजाराम महाराज यांनी आपले सेनापती खंडेराव दाभाडे यांस बागलाणमध्ये चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्यास पाठविले. त्यांनी हे कर बागलाणमध्ये वसूल केले. परंतु त्याच्याही पुढे जाऊन सुरत जिल्ह्यातही वसूल केले. इ.स. 1705 मध्ये खंडेराव दाभाड्यांनी मोठ्या प्रमाणावर स्वारी करून, नर्मदापार जाऊन मोगलांच्या दोन सैन्याचा पराभव केला. यानंतर गुजरातपासून-बऱ्हाणपूर पर्यंत त्यांनी आपल्या सैन्यांच्या तुकड्या कायम ठेवून, स्वत: काठेवाडात सोरठपर्यंत स्वारी केली. या स्वाऱ्यांतून त्यांना मुख्य मदत त्यांच्या हाताखालील सरदार दमाजीराव गायकवाड यांची झाली.

''या गायकवाड घराण्याचे मूळचे उपनांव मत्रे हे होय. यांचा मूळ पुरूष नंदाजीराव असल्याचे कळते. मत्रे या उपनावाचे पुढे मंत्री असे रुप झाले, व त्या घराण्यातील पुरुष पुढे गायकवाड म्हटले जाऊ लागले.

नंतर दोन्ही नावांचे संयुक्त नाव मिळून मंत्रीगायकवाड असे म्हणण्यात येऊ लागले. [1] या 'गायकवाड' नाव पडण्याबद्दल आख्यायिका प्रसिद्ध आहे.

''नंदाजी नावाचा एक इसम भोर संस्थानांत एका किल्ल्याचा अंमलदार होता. एके दिवशी एक मुसलमान खाटिक किल्ल्याजवळून कांही गाई घेऊन चालला असता नंदाजीस त्यांची दया येऊन त्यानें किल्ल्याचे कवाड(दार) उघडून काही गाई आंत घेऊन त्यांचा जीव वाचवला. म्हणून त्याचे गायकवाड हे नाव पडले. हा नंदाजी म्हणजे गायकवाड घराण्याचा संस्थापक दमाजी याचा आजा होय.''[2]

या गायकवाडांचे मूळ गाव दावडी, तालुका खेड, जि. पुणे हे होय. नंदाजीराव या गावी शेती करीत असत. त्यांना चार पुत्र असून त्यापैकी तिघे त्यांच्याप्रमाणे शेती करु लागले. पण त्यातील एक पानाजीराव उर्फ दमाजीराव यांच्या अंगी शौर्य असल्यामुळे, व त्यांस शेतीचा व्यवसाय पसंत न पडून, ते शाहू महाराजांचे तत्कालीन सेनापती खंडेराव दाभाडे यांच्याकडे सैन्यात नोकरीस राहिले.

बडोद्याच्या इतिहासात पहिले दमाजीराव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या सरदारच्या शौर्याचा आणि गुणचातुर्याचा गौरव, त्यांना शाहू छत्रपतींनी इ.स. 1721 मध्ये 'समशेर बहादूर' हा किताब देऊन व नायब म्हणजे दुय्यम सेनापती म्हणून नेमणूक करून केला. 'समशेर बहादूर' हा किताब सत्ताधारी गायकवाडांनी अभिमानपूर्वक कायम ठेवला, कारण त्यांना त्यायोगे पेशव्यांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त झाले होते. दमाजीराव गायकवाड इ.स. 1720 च्या अखेरीस मरण पावले. दमाजीराव निपुत्रिक असल्याने त्यांनी बंधूचे चिरंजीव पिलाजीराव यांना दत्तक घेतले होते. पिलाजीरावांना थोरले बाजीराव पेशवे यांच्या महत्त्वाकांक्षेची जाण होती. इ.स. 1720 पासून पुढे मराठ्यांची सत्ता गुजरातेवर बसविण्याचे कार्य त्रिंबकराव दाभाडे व पिलाजीराव यांनी केले. पिलाजीरावांनी दाभाड्यांतर्फे इ.स. 1719 मध्ये सुरतेवर स्वारी केली. खंडण्या वसूल केल्या. आणि सोनगढ येथे कायमचे ठाणे केले. पुढे सुरत अठाविशितून दोन वर्ष खंडण्या गोळा केल्या, अंमल बसविला. ''या कामी पिलाजीरावास राजपिपळेकर अनुकूल होता. मुसलमान अधिकारी हिंदूवर जुलूम करीत. त्यांच्या बायकांची अब्रू घेत. तेव्हा मुसलमानी अंमल गुजरातेतून लवकर नाहीसा व्हावा या उद्देशाने गुजरातेतील पटेलवर्ग गायकवाडास जास्त सहाय्य देऊ लागला. अशाच कारणाने असंतुष्ट असलेले दला

पाटील, पादरेकर, एक छाणीकर व एक भायलीकर अशा तीन पटेलांनी पिलाजी गायकवाडांशी संधान बांधले.[3] त्यांच्या संमतीने व माहितीच्या आधारे पिलाजीरावांनी डिसेंबर 1723 मध्ये मही नदीच्या किनाऱ्यापर्यंत जाऊन खंडण्या गोळा केल्या. जून 1724 मध्ये त्रिंबकराव दाभाडे व गायकवाड यांनी सुरत अठाविशीमध्ये अंमल बसवून सबंध गुजरात प्रांतावर चौथाईची खंडणी लागू केली. चौथाईबद्दल बांडे व गायकवाड यांच्यात भांडण झाले, परंतु अर्धा चौथ घेण्याच्या करारावर सलोखा झाला. याच सुमारास बाजीराव पेशवा (थोरले) व दाभाडे यांच्यात वैमनस्य निर्माण होऊन भिलापूरच्या लढाईत त्रिंबकराव दाभाडे मारला गेला व पिलाजीराव जखमी झाले. पुढे त्र्यंबकराव दाभाडे यांच्या सेनापतीपदी त्यांचा पुत्र यशवंतराव दाभाडे हा आला व पिलाजीराव गायकवाडास पूर्वी प्रमाणेच त्याचा मुतालिक नेमण्यात आले. आणि 'सेनाखासखेल' हा नवीन किताबही त्यांना मिळाला. याच वेळेस यशवंतराव दाभाडे वयाने लहान असल्यामुळे सर्व अधिकार गायकवांडाकडे आले. गुजरातेत गायकवाडांचे प्रस्थ अधिक वाढत गेले.

पिलाजी गायकवाडांनी मोगल सुभेदार जोधपूरच्या अभयसिंहाविरुद्ध चाल केली. सरळ सरळ पिलाजीचा पराभव शक्य नसल्याने मोगल सुभेदाराने विश्वासघाताने इ.स. 1732 मध्ये डाकोर येथे पिलाजींचा खून करविला. आणि त्यांच्या ताब्यात असलेले बडोदा शहर आपल्या ताब्यात घेतले. आणि शेरखानबाबी यांच्याकडे शहराचा अंमल सोपविला. आसपासच्या भिल्ल आणि कोळी लोकांनी अभयसिंहाविरुद्ध बंड केले. आणि त्यांच्या मदतीने अभयसिंहावर आक्रमण करुन पिलाजीचा भाऊ महादजी याने बडोदा शहर काबीज केले.

पिलाजीच्या खुनाने त्यांचे पुत्र संतापले. दाभाड्यांच्या मातोश्री उमाबाई हिने अहमदाबादेवर दमाजी गायकवाडासह (दुसरा दमाजीराव) चाल केली. आणि अहमदाबाद शहराची अर्धी सत्ता आणि वसुलीचा हक्क संपादन केला. इ.स. 1734 मध्ये दमाजीरावाने बडोद्यावर स्वारी करुन शेरखानबाबीस पराभूत केले. तेव्हापासून हे शहर गायकवाडांच्या ताब्यात आले, ते कायमचे.

शाहूच्या मृत्यूनंतर दमाजीराव ताराबाईच्या पक्षास मिळाले व त्यांनी पेशव्यांशी विरोध आरंभिला. *(इ.स. 1749 साली शाहू महाराज मृत्यू पावल्यावर रामराजा छत्रपतींच्या गादीवर बसले. ही गोष्ट त्यांची*

*आजी व राजाराम महाराजांची स्त्री ताराबाई हिला पसंत पडली नाही. रामराजांचे मुख्य पुरस्कर्ते नानासाहेब पेशवे होते)* दमाजीराव गायकवाड फौजेसह सातार्‍यास येत असताना पेशव्याने त्यांच्यावर हल्ला केला आणि कैद केले. त्यावेळेस दमाजीच्या भावाने म्हणजे केदारजी याने गुजरात प्रांत सांभाळला. सुरत जिल्ह्याच्या वसुलीचा काही भाग मिळविला. दमाजीरावास कैदेत ठेवूनही काही लाभ होत नाही असे दिसून येताच पेशव्यांनी दमाजीरावाशी तह करण्याचे ठरवले. इ.स. 1752-53 मध्ये पेशवे आणि गायकवाड यांच्यात सलोख्याचा करार झाला. पेशवे आणि गायकवाड यांनी भावी काळात सहकार्याने काम करण्याचे ठरविले. या करारान्वये बडोदे राज्यात असणारी अनेक शहरे गायकवाडांच्या ताब्यात आली. या अंतर्गत दक्षिण गुजरातमधील खुद्द बडोदे, नवसारी आणि गणदेवी, तसेच उत्तर गुजरातेतील वीजापूर, पाटण, विसनगर, सामी, मुजपूर, वडनगर, खेरालू, राधनपूर व सिधपूर या काही शहरांचा अंतर्भाव होता. शिवाय अहमदाबाद व सुरत या शहरांच्या महसुलातही त्यांना हिस्सा मिळाला.

इ.स. 1761 मध्ये पानिपतचे घनघोर युद्ध झाले. त्यातून जी मंडळी जीव वाचवून पळाली त्यात दमाजीराव होते. त्यानंतर दमाजीने काठेवाडांतील बराच प्रांत जिंकला. लाठी संस्थानच्या राजाच्या मुलीशी लग्न केल्यामुळे त्यांस आसपासचा प्रदेश हुंडा म्हणून मिळाला.

''बाळाजी (नानासाहेब) बाजीराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर पेशवे घराण्याविषयीचा दमाजीचा द्वेष पुन्हा उफाळून आला. इ.स. 1752 मध्ये पेशव्यांशी सक्तीने कराव्या लागलेल्या तहनाम्याबद्दल त्यांच्या मनात कायमची रुखरुख असल्याने तो असमाधानी होताच. तेव्हा माधवरावाला पेशवाई मिळाल्यावर त्याचा चुलता रघुनाथराव (राघोबा) याने गादीवर हक्क सांगण्यास प्रारंभ करताच दमाजीने आपला पुत्र गोविंदराव यास त्याच्या मदतीस पाठविले.''[4] परंतु घोडप येथे त्यांचा पराभव झाला. माधवरावाने दरवर्षी -15 लाख जादा खंडणी, 23 लाख रुपये दंड, पुण्यास नेहमी 3 हजार फौज, व युद्ध प्रसंगी जास्त 4 हजार सैन्य इतक्या गोष्टी कबूल करवून त्याची सुटका केली. इ.स. 1768 साली दमाजीराव मरण पावले. पिलाजीराव आणि दमाजीराव या दोन पुरुषांनी गायकवाड घराणे उदयास आणले आणि गुजरातेन गायकवाडांची सत्ता कायम केली. दमाजीरावांनी मोठ्या मुत्सद्दीपणे पेशव्यास गुजरात आपल्या हाती घेण्यास संधी दिली नाही.

दमाजी गायकवाडास तीन बायका असून गोविंदराव, पहिला सयाजीराव, फत्तेसिंहराव व मानाजीराव असे एकूण चार पुत्र होते. दमाजीरावांच्या मृत्यूसमयी त्यांचा पुत्र गोविंदराव हा पेशव्यांच्या अटकेत होता. पण नंतर त्याने पेशव्यांच्या अटी कबूल करून आपली सुटका करून घेतली व दरबारांतून गादीचा हक्क आणि 'सेनाखासखेल' ही पदवी मिळविली. परंतु फत्तेसिंग याने सयाजी हा वडील मुलगा असल्याने त्याचा हक्क रूजू व्हावा या संबंधी खटपट चालविली. पेशवाईतील सुप्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री यांनी दिलेल्या निकालावरुन इ.स. 1771 साली सयाजीस 'सेनाखासखेल' ही पदवी प्राप्त झाली व फत्तेसिंह त्याचा मुतालिक बनला. त्यामुळे गोविंदराव व फत्तेसिंह यांच्यात वैर निर्माण झाले, त्या दरम्यान राघोबास पेशवाई पद प्राप्त झाले. त्याने गोविंदरावास पुन्हा 'सेनाखासखेल' हे पद दिले. गोविंदरावाने आपला अंमल बसविण्यासाठी बडोद्यास वेढा घातला. याचवेळेस पुण्यात बारभाईचे कारस्थान होऊन राघोबा पदच्युत झाला. मदतीसाठी राघोबा गोविंदरावाकडे आले. परंतु त्याच्या पाठोपाठ पेशव्यांची फौज घेऊन सेनापती हरिपंत फडके हेहि चाल करून आले. त्यामुळे गोविंदरावास बडोद्याचा वेढा उठवावा लागला. फत्तेसिंह व हरिपंत यांची सैन्ये एकत्र येऊन त्यांनी गोविंदराव तसेच राघोबा यांस पराभूत केले. तेव्हा गोविंदराव पालनपूराकडे पळून गेला व राघोबादादा इंग्रजांच्या आश्रयास गेला.

राघोबास घेऊन इंग्रजी फौज कर्नल कीटिंगच्या नेतृत्वाखाली गुजरातेत आली व गोविंदरावांच्या विनंतीवरून त्यांनी बडोदे घेण्याचे ठरविले. या वेळी फत्तेसिंहाने इंग्रजांशी समेट केला व राघोबास पैसे व लष्कर यांची मदत करण्याचे वचन दिले. राघोबाने दक्षिणेत गोविंदरावास जहागीर द्यावी आणि इंग्रज सरकारला या तहनाम्याच्या जामिनकीबद्दल भडोच व इतर परगण्यांचा वसूल द्यावा या अटी ठरल्या. या तहाने इंग्रजांचा पुष्कळ फायदा झाला.

याच काळात, इ.स. 1772 मध्ये इंग्रजांनी भडोच जिंकून गुजरातेत आपले पाय रोवले व याचवर्षी गोविंदराव व पेशवे यांच्यात झालेल्या युतिविरुद्ध फत्तेसिंहरावाने इंग्रजांकडे साहाय्य मागितले. पण त्यात त्यांना यश आले नाही. इंग्रजांची मदत मिळण्यापूर्वीच गायकवाडांचे तीन कर्तबगार पुरुष एकामागून एक मृत्यूमुखी पडले. ''इ.स. 1789 मध्ये फत्तेसिंहरावाचे निधन झाले, त्याच्या पाठोपाठ इ.स. 1792 मध्ये

पहिला सयाजीराव व इ.स. 1793 मध्ये मानाजीराव मरण पावला.'' [5] यामुळे गोविंदरावांच्या हाती सर्व कारभार आला.

ब्रिटिशांच्या डावपेचांची कल्पना पेशव्यांना पूर्वीच आली होती. आपापसातील वाद इंग्रजांच्या पथ्थी पडतील याची जाणीव होऊन, इंग्रजांची वाटचाल रोखण्याच्या उद्देशाने, गायकवाडांशी तडजोड करायचे ठरवून गोविंदरावांना 'सेनाखासखेल' हा किताब दिला. त्याच्या बदल्यात तापीच्या दक्षिणेकडील सर्व मुलूख आणि सुरतेच्या महसुलापैकी गायकवाडांचा वाटा आपल्याला द्यावा, असा आग्रह ही पेशव्यांनी धरला. पेशवे आणि गायकवाड यांच्यात असा करार होणे इंग्रजांना नको होते.त्यांनी साल्हे येथील तहाची पुन्हा जाणीव देऊन पेशव्यांना असा मुलूख देण्यास प्रतिबंध केला. इंग्रजांची नाराजी ओढवून घेणे हे पेशव्यांच्या दृष्टीने योग्य नव्हते त्यामुळे त्यांनी माघार घेतली. गोविंदरावांनी पेशव्यांचा अहमदाबाद येथील प्रतिनिधी आबा शेलूकर यांस तेथून हाकलून दिले व वार्षिक पाच लक्ष भाडेपट्टाने अहमदाबाद क्षेत्र आपल्याकडे घेतले. गोविंदरावांनी इ.स. 1800 मध्ये देह ठेवला.

गोविंदरावांचा पुत्र आनंदराव गादीवर आला. तो नाकर्ता ठरल्यामुळे त्यांचा आनैरस पुत्र कान्होजी याने गादी बळकावली. परंतु आनंदराव यांचा दिवाण रावजी अप्पाजी यांनी इंग्रजांची मदत घेऊन कान्होजी तसेच आनंदरावांचा चुलता मल्हारराव यांस दूर केले. इंग्रजांनी दोघांनाही कैदेत टाकले.

इ.स. 1802 साली रावजी अप्पाजीशी इंग्रजांनी एक खासगी गुप्त करारनामा करुन, गोविंदरावांच्या वंशजांच्या रक्षणाची जबाबदारी घेतली व गायकवाडांवर इंग्रजांनी तैनाती फौज लादली. याच सुमारास पेशव्यांनी (दुसरा बाजीराव पेशवे) ब्रिटिशांशी वसईचा तह करून त्यात पेशवे व गायकवाड यांच्यातील तंटे ब्रिटिशांमार्फत सोडवावे ही गोष्ट कबूल केली. वसईचा तहाने तीन महत्त्वाच्या गोष्टींचा निकाल लागला.

''1. गायकवाड बडोद्याचे राज्यकर्ते ठरले.

2. पेशव्यांची सत्ता चोंहीकडून संपुष्टात आली.

3. हिंदुस्थानच्या राजकारणात इंग्रजांचे पूर्ण वर्चस्व प्रस्थापित झाले आणि 'ते म्हणतील ते धोरण'

ही गोष्ट सर्वांस उघड झाली. गायकवाडांच्या संरक्षणाची हमी घेऊन त्यांनी मेजर वॉकर (इ.स. 11 जुलाई 1802-1809) याची रेसिडेंट म्हणून बडोद्यास नेमणूक केली.'' [6]

## आ) गायकवाड आणि ब्रिटिश सत्ता यांच्या संबंधाची सुरुवात :

बडोद्यात येताच, वॉकरने परस्परांतील संबंध दृढ करण्याच्या हेतूने आधीचे सारे करारनामे एकत्र करुन, 21 एप्रिल, 1805 रोजी तहनामा जाहीर केला. त्याप्रमाणे बडोदे संस्थानाच्या संरक्षणार्थ शिस्तबद्ध फौजेची व्यवस्था झाली. फौजेच्या निभाव खर्चासाठी गायकवाडांना काही मुलूख पुन्हा इंग्रजांच्या स्वाधीन करावा लागला. त्यानुसार, दुसऱ्या दमाजीरावांनी नानसाहेब पेशव्यांशी केलेल्या करारानुसार प्राप्त झाला तो, अहमदाबादच्या भाडेपट्टीचा हक्क इंग्रजांना मिळाला. खेडा, चौऱ्याशी व चिखलीप्रमाणे अहमदाबादचे उत्पन्न इंग्रजांनी बळकावले. इ.स. 1805 च्या तहनाम्यानुसार बडोद्याने आपला एक सार्वभौम हक्क इंग्रजांना सुपूर्द केला होता तो म्हणजे परराष्ट्रीय संबंधांचा. या तहनाम्यानुसार त्यांनी पेशव्यांबरोबरचे वा इतर सत्ताधीशां बरोबरचे तंटे परस्पर न मिटविण्याचे मान्य केले. तहनाम्यात उभयपक्षांच्या संमतीविना उभयतांच्या प्रजाजनांस नोकऱ्या व थारा न देण्याचे कलम होते. ही सर्व बंधने पत्करून आनंदरावाचा बंधू दुसरा फत्तेसिंहराव इ.स. 1806 साली राज्याचा मुखत्यार (रीजंट) बनला. पुढे इ.स. 1818 साली त्याचे निधन झाले. पण तोपर्यंत अंतर्गत आणि बर्हिगत धोक्यापासून संरक्षणाचा अनिवार्य मोबदला म्हणून इतर अनेक शर्ती इंग्रजांनी घातल्या होत्या.

बडोद्यात वॉकरचा अंमल असेपर्यंत (इ.स.1802-1809) वॉकरने, संस्थानच्या प्रत्यक्ष अस्तित्वालाच धोकादायक ठरणाऱ्या अनेक गंभीर संकटांपासून संस्थानाला वाचविले. आनंदरावाचा सावत्रभाऊ कान्होजीराव आणि त्याचा आणखी एक आप्त, कडीचा जहांगीरदार मल्हारराव या दोघांनी गादीवर हक्क सांगण्यास सुरूवात करून कारस्थाने सुरू केली होती, पण त्यांचा इंग्रजांच्या साहाय्याने पराभव करण्यात आला व त्यांना पुढे मद्रास व मुंबई येथील तुरूंगात ठेवण्यात आले. तलवारीच्या जोरावर खंडणी वसूल करणाऱ्या अरबांच्या रूपातील मोगलाई प्रथेच्या उरल्यासुरल्या अवशेषांची जुलूमजबरदस्ती नष्ट करुन, कर्नल अलेक्झांडर वॉकरने वसुलीची जवाबदारी इंग्रजांनी पेलावी, अशी भलावण केली. वॉकरच्या

कर्तृत्वामुळे राजगादीवर कर्तृत्वशून्य व्यक्ती असूनही संस्थान भरभराटीस आले. इंग्रजांच्या व्यवस्थेविषयी देशात आदराचे वातावरण निर्माण झाले.

इंग्रजांना एतद्देशीय राजांची सत्ता मिळविण्यासाठी स्थानिक देशी राजसत्तेस टक्कर द्यावी लागे. बडोदे संस्थानची सत्ता मिळविण्यासाठी त्यांना लढाई करावी लागली नाही. म्हणून ब्रिटिश सरकार गायकवाडांचा उल्लेख 'मित्र' असा करत असे. गायकवाडांनाही स्वत:स 'इंग्रज सरकारचे अजिंक्य मित्र' म्हणवून घ्यायला आवडत असे. मित्र या नात्याने त्यांना इतर संस्थानिकांपेक्षा वेगळ्या आणि सन्मानाच्या वागणुकीची अपेक्षा असे. ती पूर्ण झाली नाही की ते दुखावत व इंग्रजांना विरोध करत. दुसऱ्या व तिसऱ्या सयाजीरावांनी असा उघड असंतोष व्यक्त करुन इंग्रजांशी सतत संघर्ष पेलला.

आनंदराव निपुत्रिक होते. त्यांचे 1819 साली निधन झाले. म्हणून दुसरे सयाजीराव गादीवर आले. आनंदरावांपेक्षा दुसरे सयाजीराव स्वभावाने विलक्षण भिन्न प्रवृत्तिचे होते. ते अनन्य उत्साही, स्वमताविषयी आग्रही आणि स्वत:च्या उद्दिष्टांबाबत अगदी ठाम होते, असे त्यांचे वर्णन 'बडोदा गॅझेटियर'ने केलेले आहे. ''दुसऱ्या सयाजीरावांना आपल्या कामात ढवळाढवळ केलेली अजिबात खपत नसे. म्हणून त्यांचे इंग्रजांशी सतत खटके उडत. ते नीतिवान होते. त्यामुळे प्रजेच्या मनात त्यांच्याविषयी प्रेम आणि आदर होता. पण सरकारशी सातत्याने होणारे मतभेद आणि चकमकी, यांमुळे त्यांच्या काळात संस्थानाच्या प्रगतीचा वेग थोडा मंदावला.'' [7]

आपल्या हक्कासाठी झगडा चालू असतानाच दुसऱ्या सयाजीरावांचे 1847 साली निधन झाले. त्यांच्यामागून त्यांचे तीन पुत्र गणपतराव (1847-56), खंडेराव (1856-70) व मल्हारराव (1870-75) तिघेही एकामागून एक गादीवर आले. यापैकी गणपतराव आत्मसंतुष्ट व निराग्रही होते. त्यांना ख्यालीखुशालीत जीवन जगण्याव्यतिरिक्त कसलीच आस नव्हती. त्यामुळे त्यांचा कारकिर्दीत इंग्रज रेसिडेंट कॅप्टन फ्रेंच हाच सत्ताधीश होता. त्याने त्या काळात रस्तेबांधणी, बालहत्या प्रतिबंध, मुलांच्या विक्रीवरील बंदी, रेल्वेचा प्रारंभ वगैरे लोकहिताची कार्ये केली.

खंडेराव महाराजांना जडजवाहीर, शिकारी आणि भव्य इमारती यांची खूप हौस होती. बडोदे राज्यातील अभयारण्याच्या परिसरात त्यांनी मकरपुरा पॅलेस नावाच्या वैभवसंपन्न प्रासादाची निर्मिती केली. खंडेराव महाराज सक्षम आणि सज्जनही होते. याच सुमारास इ.स. 1857 च्या उठावाचा प्रक्षोभ हिंदुस्तानात उसळला होता. त्या निमित्ताने, खंडेरावांच्या मनातील बंडाची इच्छाही उसळ्या मारू लागली. पण वेळीच सावध होऊन आपल्या जवाबदारीशी ते एकनिष्ठ राहिले. त्यानंतर सौराष्ट्रातील बंडाचा बिमोड करण्यासाठी त्यांनी इंग्रजांना मदत केली. त्यांच्याकडून झालेल्या मैत्रीसंबधावर त्यांच्या सेवेची दखल घेऊन इंग्रजांनी त्यांना 'ग्रँड कमांडर ऑफ इंडिया' (G.C.S.I.) हा किताब देऊन कृतज्ञता व्यक्त केली.

खंडेरावांनी तीन विवाह केले, पण त्यांना पुत्रप्राप्ती झाली नाही. म्हणून त्यांनी 1866 साली जमनाबाई यांच्याशी विवाह केला. त्यांचा 1870 साली अत्यंत अनपेक्षितपणे मृत्यू झाला. त्यावेळी जमनाबाई गरोदर होत्या. बंधू मल्हारराव, खंडेरावांविरुद्ध खुनाचा कट रचल्याच्या आरोपावरुन तुरुंगात होते. नियमाप्रमाणे त्यांना गादी मिळाली, पण जमनाबाईस पुत्र झाल्यास राज्यास वारस मिळेल, या आशेने त्यांना सर्व अधिकार देण्यात आले नाहीत. मर्यादित अधिकार असूनही मल्हाररावांनी खंडेरावांच्या मर्जीतील लोकांचा अमानुष छळ आरंभला. जुलै 1871 मध्ये राणी जमनाबाईने कन्येलाच जन्म दिला. म्हणून इंग्रजांना मल्हाररावांच्या हाती सर्वाधिकार सुपूर्द करावे लागले. अर्थात सार्वभौमत्व इंग्रजांकडेच होते.

मल्हाररावांच्या पाच वर्षाच्या कारकिर्दीत बडोद्याच्या इतिहासात अनेक प्रश्न निर्माण झाले. खंडेरावांशी एकनिष्ठ असणाऱ्या लोकांना त्यांनी धारेवर धरले. ''मल्हाररावांचे एकूण चरित्रच संशयास्पद होते, असे पुरावे आढळतात. होळीसारख्या सणांचे पर्यावसान अनेकदा कित्येक स्त्रियांना शारीरिक तसेच मानसिक त्रास देण्याइतपत होत असे.'' [8] त्यावेळी रेसिडेंटच्या पदावर कर्नल ब्रार होता. (Jan 1866 - May 1867, Nov 1867-April 1872) त्याची मानसिकताही मल्हाररावांच्या वृत्तीशी मिळणारी होती. रेसिडेंट ब्रारची मुदत संपली. त्यांच्या जागी कर्नल फायरेची नेमणूक झाली. तो मल्हाररावांच्या गैरकारभाराचे अहवाल सरकारला प्रामाणिकपणे पाठवू लागला. मुंबई सरकारने रेसिडेंट फायरेच्या अहवालांना दुजोरा दिला. ब्रिटिश सरकारने कर्नल रिचर्ड मीड यांच्या अध्यक्षतेखाली सन् 1873 च्या उत्तरार्धात चौकशी

आयोगाची नेमणूक केली. या आयोगातर्फे मल्हाररावांवर कुप्रशासन आणि गैरकारभार असे दोषारोप करण्यात आले. आपल्या पसंतीचा चांगला दिवाण नेमून सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांना एक वर्ष इतकी संधी देण्यात आली. त्याबरोबर असा इशाराही देण्यात आला की, नेमून दिलेल्या मुदतीत प्रशासन सुधारले नाही, तर त्यांना पदच्युत करण्यात येईल.

कर्नल रिचर्ड मीड (Apr 1875 - Nov 1875) यांच्या अहवालाप्रमाणे बडोद्याच्या दिवाणपदावर तातडीने दादाभाई नवरोजी चार विश्वासू सल्लागारांसह रुजू झाले. पण दादाभाईंच्या आगमनाने आपला अपमान झाला आहे व आपले महत्त्व कमी होत आहे असे कर्नल फायरेस वाटले. परिणामी तो दादाभाईंच्या कामात असंख्य अडचणी निर्माण करु लागला. 'दादाभाई अकार्यक्षम आहेत' असा त्याने प्रजेत प्रसारही सुरु केला. परिणामी, दादाभाईंनी या संदर्भात गव्हर्नर जनरल लॉर्ड नॉर्थब्रुक यांच्याकडे तक्रार केली. चौकशी अंती, फायरेच्या जागी सर लुई पेली (Dec 1847 - Apr 1875) यांची नेमणूक करण्यात आली. याच सुमारास कर्नल फायरे याने 9 नोव्हेंबर रोजी शेवटचा फटका लगावला. एके संध्याकाळी आपल्या सरबताच्या पेल्यात आर्सेनीक मिसळून मल्हाररावाने आपल्यावर विषप्रयोग केल्याचा त्याने आरोप केला. म्हणून मल्हाररावांना अटक करण्यात आली. रेसिडेंटने केलेल्या आरोपाची चौकशी करण्यासाठी सर रिचर्ड काऊच याच्या अध्यक्षतेखाली दुसरा एक आयोग नेमण्यात आला. रीतसर चौकशी झाली, पण निर्णय लागू शकला नाही. इंग्रज सदस्यांनी मल्हाररावांना दोषी ठरविले, तर हिंदी कमिशनर्सनी तसा आरोप सिद्ध होत नाही असे जाहीर केले.

याच वेळी महाराणी जमनाबाई यांनी हिंदुस्तान सरकारकडे अर्ज केला की महाराणी व्हिक्टोरिया यांच्या जाहीरनाम्यान्वये खंडेराव महाराजांस दत्तक घेण्याचा हक्क मिळाला होता. पण त्याचा उपयोग त्यांना करता आला नाही, तरी या बाबतीत दत्तक घेण्याचा हक्क स्वत:ला (म्हणजे खंडेरावांच्या पत्नी जमनाबाई यांना) मिळावा. हिंदुस्तान सरकारने यावर स्टेट सेक्रेटरी लॉर्ड साल्सबरी यांस बडोदे राज्यात गोंधळ माजविल्याबद्दल मल्हाररावांना गादीवरून काढून खंडेराव महाराजांच्या पत्नी महाराणी जमनाबाई यांना "हिंदुस्तान सरकार सत्पात्र ठरवून ज्याच्या हाती बडोद्याची सत्ता सोपविण्यास तयार होईल, अशा गायकवाड घराण्यातील एखाद्या व्यक्तीस दत्तक घ्यावे असा जाहीरनामा देण्यात आला." [9]

जाहीरनाम्यातील तरतुदी अमलात आणण्यासाठी ता. 2 मे 1875 रोजी महाराणी जमनाबाई यांस बडोद्यास आणण्यात आले. आणि इंदूर संस्थानात काही काळ मंत्रीपदावर असणाऱ्या सर टी. माधवराव यांची बडोद्याच्या दिवाणपदी सरकारने नेमणूक केली. त्यानंतर महाराणी जमनाबाई यांच्या मांडीवर एखादा मुलगा दत्तक घेण्याचे काम ब्रिटीश सरकारकडून सर टी. माधवराव व खुद्द महाराणी यांच्या पसंतीवरच सोपविण्यात आले.

या प्रमाणे सूत्रधाराची नेमणूक केल्यानंतर सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे राज्यास मालक शोधण्याचा होता. तो सोडवितांना स्वाभाविक रीतीने प्रथमतः शोधकांची दृष्टी राजघराण्याच्या नजीकच्या आप्तांकडे वळली. अशा आप्तांपैकींचे चार इसम त्या वेळी बडोद्यास होते. ते म्हणजे 1. सदाशिवराव 2. मुरारराव 3. गणपतराव व 4. खंडेराव हे होत. सरकारने दत्तक वारस मान्य केल्यामुळे या सर्वांच्या तोंडास पाणी सुटले. त्यांच्यात सत्तेसाठी स्पर्धा सुरु झाली. अफवांना ऊत आला. मल्हाररावांच्या काही बिलंदर साथीदारांनी उठावाचा प्रयत्नही केला.

सर रिचर्ड मीड, माधवराव आणि जमनाबाई यांच्या रिजन्सी कौन्सिलने बडोद्यातील वारसदारांपैकी त्यांना कुणी पसंत नसल्याचे मत जाहीर केले. म्हणून इतर व्यक्तीचा शोध गरजेचा ठरला. सर रिचर्ड, माधवराव व महाराणी जमनाबाई यांच्या रीजन्सी कौन्सिलने 'अत्यंत सुयोग्य व्यक्ती' चा शोध सुरू केला. बडोद्यातील वारसदारांपैकी एकही व्यक्ती 'सुयोग्य' न आढळल्याने बडोद्याबाहेर शोध सुरू झाला. मनमाडजवळील कवळाणे गावी, पिलाजीरावांचे पुत्र म्हणजे दुसऱ्या दमाजीरावांचे कनिष्ठ बंधू प्रतापराव हे शेताच्या तुकड्यावर गुजराण करीत असत. बडोदे राज्याच्या हिशेबाच्या वहयात, खंडेराव या चुलत घराण्यास अधूनमधून मदत करत असल्याच्या नोंदी होत्या. प्रतापरावांना पाच पणतू होते. प्रत्येकास बरीच मुले होती. म्हणून पसंतीस बराच वाव होता. परंतु स्थानिक वारसदारांस हे आवडले नाही. त्यांनी 'प्रतापराव अनौरस संतती आहेत आणि अनौरस संततीस दत्तक घेण्यास धर्माची संमती नसते' असा ओरड केला. नाशिक येथे तपास होऊन औरसपणाची कसून चौकशी झाली. उपाध्यायांच्या नोंदी तपासण्यात आल्या. कारण अनौरस संततीचा उपाध्यायांच्या चोपड्यात समावेश होत नसतो. पंढरपूरच्या आणि नाशिक-

त्र्यंबकेश्वराच्या उपाध्यायांच्या चोपड्यात प्रतापरावांचे नाव सापडले व त्यांची शाखा औरस ठरली. अशा प्रकारे जमनाबाईंनी प्रतापरावांचे पणतू काशीराव गायकवाड यांच्या गोपाळराव या द्वितिय चिरंजीवांची निवड वारसासाठी केली. बडोद्याच्या राजगादीवर तिसरे सयाजीराव म्हणून त्यांची स्थापना झाली.

स्थानिक हक्कदारांपैकी गणपतराव व खंडेराव यांनी नव्या परिस्थितीशी जुळवून घेतले. मुराररावाने निराशेपोटी गोळी झाडून आत्महत्या केली. सदाशिवराव नव्या व्यवस्थेमुळे असंतुष्ट होता. काही अप्रिय घटना घडू नयेत म्हणून त्याला अटक करून पेन्शनवर त्याची रवानगी काशीला करण्यात आली.

महाराणी जमनाबाईंनी 27 मे 1875 रोजी, सुमुहूर्तावर गोपाळरावाला पारंपरिक विधिपूर्वक दत्तक घेतले. सर रिचर्ड मीड यांनी अक्षरश: उचलूनच त्याला राजसिंहासनावर बसविले. गोपाळरावाने **'तिसरे सयाजीराव'** असे नाव धारण केले. 'स्टेनले राईस' ने सयाजीरावांचे जीवनचरित्र लिहिले आहे. आपल्या ह्या ग्रंथात एके ठिकाणी त्याने एक महत्त्वपूर्ण वाक्य लिहिले आहे. ''SELDOM did fate play a stranger trick than when she selected the little boy of Kavlana and placed him on the throne of Baroda'' [10]

दुसऱ्या मल्हाररावाची नव्याने पुनरावृत्ती होऊ नये म्हणून बडोद्याच्या तत्कालीन परिस्थितीत एखाद्या अज्ञान मुलाची निवड करावी, त्याला राजपदासाठी चांगले शिक्षण देऊन तयार करावा, हे ब्रिटीश सरकारला श्रेयस्कर वाटले. कारण असे वाटण्यामागे एक विचार हा असावा की, काही काळपर्यंत बडोद्यात अज्ञान बालकाची राजवट राहिली तर, बडोदे संस्थान आणि सार्वभौम सत्ता यांच्यातील अनेक अनिर्णीत प्रश्न फारसा तीव्र विरोध न होता आपल्याला हवे तसे निकालात काढता येतील. स्थानिक गायकवाड कुटुंबातील लोक जमनाबाई बडोद्याच्या नसल्याने, त्यांना उपऱ्या समजत. त्यांनाही, स्थानिक वारसदारांपेक्षा त्यांच्या सारखा उपरा वारस गादीवर येणे आवडेल असे सरकारला वाटले.

## इ) सयाजीराव गायकवाड (तिसरे) :

सयाजीराव हे काशीराव आणि उमाबाई या दांपत्याचे पुत्र. त्यांचा जन्म 11 मार्च 1863 रोजी झाला. थोरला भाऊ आनंदराव यांच्याहून ते पाच वर्षांनी लहान तर धाकटा भाऊ संपतराव याच्यापेक्षा दोन वर्षांनी मोठे होते.

कवळाणे हे खेडेगाव होते. दीड-दोनशे घरे, दोन देवळे, एक छोटीशी नदी आणि गावाच्या मध्यभागी असलेल्या चौकात प्रचंड वटवृक्ष, इतर करमणुकीची साधने थोडी. त्यामुळे मैदानी खेळ आणि दूध, लोणी, तूप, साधे पण सकस अन्न असा आहारविहार. मुले दिवसभर उंडारत. मुलांना शिक्षण हवे याची कुणाला जाणीव नव्हती. मुलांनी मिळेल ते खावे, प्यावे, भटकावे, प्रसंगी वडिलांनी सांगितलेले एखादे काम करावे. असा त्यांचा दिनक्रम असे. कवळाणे गावात एक शाळा होती. पण या भावंडांचा तिच्याशी संबंध आला नव्हता. स्पष्टच सांगायचे झाले तर त्यांना लिहिता-वाचता येत नव्हते. वयाच्या अठराव्या वर्षी राजा म्हणून सर्वाधिकार प्राप्त करायचे होते. बारा वर्षांच्या जीवनात शिक्षणाचे वारे न लागलेल्या या मुलात इतका बदल घडवून आणण्याचे काम अजिबात सोपे नव्हते. व्यक्तिमत्त्वात आमूलाग्र बदल घडवून आणणे आवश्यक होते.

सरकारने सयाजीरावांच्या प्रशिक्षणासाठी सहा वर्षांच्या अभ्यासक्रमाची आखणी केली. त्यानुसार त्यांना मराठी, गुजराती, उर्दू आणि इंग्रजी अशा चार भाषा शिकायच्या होत्या. प्रत्येकाची लिपी भिन्न होती. त्यातही पुन्हा इंग्रजी भाषा ही अन्य तीन देशी भाषांहून अगदी परकी होती. या भाषा शिक्षणाबरोबरच इतिहास, भूगोल आणि प्राथमिक गणित या विषयांची जोड देण्यात आली. प्रशासन विषयक उत्तमोत्तम सिद्धांताची त्यांना ओळख व्हायला हवी होती. हिंदी संस्थानिक या नात्याने 'काय करावे' व 'काय करू नये' याची माहिती व्हावयास हवी होती. तसेच देशातल्या कायद्यांचाही परिचय करून घेणे आवश्यक होते. हा सर्व कार्यक्रम अशक्यच होता. यातून शेवटी काय फलित होईल, याची कल्पना नव्हती. तरी सुद्धा सयाजीरावांनी आपल्या अभ्यासक्रमास गंभीरपणे आरंभ केला. त्यांनी उत्तम विद्यार्थी व उत्तम राजा होण्याचा चंग बांधला. शिक्षणक्रम पूर्ण करून घेण्याची जवाबदारी एक आय.सी.एस. अधिकारी एफ्.ए.एच्. एलियट यांच्याकडे सोपविण्यात आली होती. पुढे या अधिकाऱ्यानेच ''रुलर्स ऑफ बरोडा'' हा अभ्यासात्मक ग्रंथ लिहिला. त्यात शिक्षणाच्या संदर्भात नोंद आहे.

''तिसऱ्या सयाजीरावांना देण्यात येणारे प्रशिक्षण हा भवितव्याचा विचार करून हाती घेतलेला अभिनव प्रयोग असल्याची जाणीव मला आधीच करून देण्यात आली होती. वयाच्या मानाने सयाजीराव

लहान दिसत. प्रथमदर्शनी प्रभाव पडण्याजोगे त्यांचे व्यक्तिमत्त्व नव्हते, पण राजचिन्हे धारण करताच त्यांच्या मुखावर आभा प्रगट होत असे. हे त्यांच्या संवेदनशील स्वभावाचे द्योतक असावे. आपल्या राजेपणाचा ते गांभीर्याने विचार करत असावेत, असाही तर्क यावरुन करता येतो. कवळाणे गावातला गोपाळराव व्रात्य नि वांड असेलही; पण राजेपणाने त्याच्यात गांभीर्य निर्माण केले. ते सुंदर नसले तरी हसतमुख आणि प्रसन्नचित्त होते. त्यांची चिकाटी दाद देण्याजोगी होती. अभ्यासास वयाच्या दृष्टीने फार उशीर झाला असूनही, त्यांनी नेत्रदीपक प्रगती केली. गणित हा जिकिरीचा विषय वाटला तरी त्यांनी तो चिकाटीने आत्मसात केला. या गुणाच्या जोरावरच ते पुढील आयुष्यात अशक्यप्राय आव्हानांना सामोरे गेले असावेत. त्यांना आट्यापाट्या, खो-खो, विटी-दांडू, पोहणे इत्यादिंची खूप आवड होती. पण प्रशिक्षणाच्या भरगच्च दिनक्रमाच्या धबडग्यात, खेळायला विशेष सवड सापडत नसे...'' 11

राजपुत्राच्या प्रगतीचा अहवाल सरकारकडे नियमितपणे पाठवला जात असे. या राजेशाही विद्यार्थ्याची प्रगती अतिशय वेगाने होत होती. अभ्यासक्रमात सतत भर पडत होती. सयाजीराव जिद्दीने आव्हाने पेलत होते.आखीव अभ्यासक्रमाबरोबरच सयाजीरावांचे सामान्यज्ञान वाढत असून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असल्याची नोंद वर्षामागून वर्षे दिवाणांना करता आलेली आहे. सर्व विषयांमध्ये गणित हा विषय त्यांना कठिण वाटला, त्यात ते नापासही होत, पण इतर विषयात मात्र त्यांनी उत्तम प्रगती केली. बघता बघता, ते इंग्रजीत छोटी भाषणे करु लागले. ते भाषणांवर खूप मेहनत घेत. त्यांचे अक्षर चांगले नव्हते. शिक्षण घाईगर्दीत झाल्याने आपले अक्षर सुधारण्यास मात्र त्यांना अवसर लाभला नाही, याची त्यांना खंतही वाटत असे. आपल्या शिक्षणात राहिलेल्या उणिवा ध्यानात घेऊन भावी आयुष्यात ते म्हणत की, ''प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पुरे होईपर्यंत आपले राज्यारोहण काही वर्ष लांबविले असते, तरी बरे झाले असते''. 12

महाराजांच्या व्यक्तिमत्त्वावर एलियटचा खूप प्रभाव होता. उभयतांत अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. एलियटनेही त्यांच्यावर वज्रलेप व्हावा, असा ठसा उमटविला होता. राजपुत्राच्या व्यक्तिमत्त्वात तसेच त्याच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावण्यासाठी एलियट मनापासून झटत. सयाजीरावांच्या मनात जबाबदारीची जाणीव आपसूक निर्माण झाली. ज्ञानग्रहणाच्या बाबतीत सुरुवातीस त्यांची गती मंद असली, तरी त्यांच्या

अंगी एक गुण होता तो म्हणजे एकदा शिकलेल्यातले ते फारसे काही विसरत नसत. भारतीय व पौरस्त्य सुधारणा व संस्कृती यांपेक्षा पाश्चात्य सुधारणा व संस्कृती अधिक श्रेष्ठ असल्याचे एलियटने तरुण व संस्कारक्षम अशा वयात सयाजीरावांच्या मनावर बिंबवले. पण मातोश्री राणी जमनाबाई यांचे त्यांच्यावर सतत लक्ष असे. 'अकाउंट ऑफ दि एज्युकेशन ऑफ हिज हायनेस' या आपल्या ग्रंथात गो. स. सरदेसाई यांनी म्हटले आहे की, साधे भारतीय पद्धतीचे अन्न, नियमित पूजा-अर्चा, काही उपास आणि नैमित्तिक सण समारंभ यांमुळे सयाजीरावांचा जीवनक्रम प्रामुख्याने भारतीय तऱ्हेचाच होता. शाळेत व राजवाड्यात त्यांच्यावर 'सक्त नजर' असे पण 'महाराणी आणि मि. एलियट त्यांच्या चतुर हातोटीमुळे त्यांना ती त्रासदायक म्हणून कधी जाणवली नाही'. असेही सांगण्यात आले आहे. कदाचित सयाजीरावांनी याची कधी तक्रार केली नसेल पण आपल्यावर सक्त नजर असे, याचा त्यांना राग येई. खाजगी वा सार्वजनिक जीवनांत त्यांच्यावर कोणी नजर ठेवली किंवा दडपण आणण्याचा प्रयत्न केला, तर त्यांनी प्रत्यक्ष विरोध केला नाही पण ते कितीतरी अस्वस्थ होत.

सयाजीरावांनी आपल्या एका आठवणीत आपल्या आईवडिलांना व नातेवाईकांना भेटण्याची आपणांस किती उत्सुकता असे, हे सांगितले आहे. पण अशा भेटी पासून काही अनिष्ट परिणाम होतील या कारणाने त्यांना त्यांच्यापासून कटाक्षाने दूर ठेवले जात असे. राजवाड्यात व सभोवताली माणसांची गर्दी असूनही सयाजीरावांना एकाकी वाटत असे. उघड भेट घेता येत नाही म्हणून आपण वडिलांना खिडकीतून खुणा करीत असू, अशी सयाजीरावांनी कबुली दिली आहे. बरोबरीच्या मुलांशी मैत्री करण्याची संधी न मिळाल्यामुळे आपण संवाद साधण्यात कमी पडतो, आपणास संवाद साधण्याची कला अवगत नाही, असेही त्यांना वाटत असे.

''दिवसाचे चोवीस तास त्यांना महाराजा म्हणून वावरावे लागे. इतरांहून आपण कोणीतरी भिन्न आहोत याची सतत त्यांना जाणीव करू दिली जात असे आणि त्यामुळेच घरगुती जीवनात सुद्धा ते या आपल्या 'महाराज' मनोवृत्तीवर मात करु शकले नाही. त्यांच्या या अलिप्त वृत्तीबद्दल त्यांची पत्नी आणि मुलेही तक्रार करीत.'' [13] प्रत्यक्ष मुलांना सुद्धा आधी संकेतवेळ ठरविल्याशिवाय त्यांना भेटता येत नसे.

परिणामी राज्यकर्ता म्हणून यशस्वी ठरणाऱ्या सयाजीराव महाराजांना, सामान्य माणूस मिळवतो ते अक्षत कौटुंबिक सुख प्राप्त करण्यात अपयश लाभले. सन् 1881 मध्ये वयाची अठरा वर्षे पूर्ण झाल्यावर डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात त्यांच्या हाती प्रशासनाचे पूर्ण अधिकार देण्याचे ठरविण्यात आले होते. त्यामुळे त्याच वर्षी मार्च ते डिसेंबर या अवधीत प्रशासनाच्या विविध पैलूंवर व्याख्याने आयोजित करण्यात आली. दिवणांसह अन्य कर्तबगार अधिकाऱ्यांनी ही व्याख्याने द्यावयाची होती.

व्याख्यानमालेची सुरुवात सर रीचर्ड मीड यांच्या जागी आलेले गव्हर्नर जनरल यांचे प्रतिनिधी पी. एस्. मेलव्हिल यांच्या व्याख्यानाने झाली. एलियटच्या उपस्थितीत मेलव्हिल यांचे 'महाराणी बद्दलची निष्ठा ठेवणे, अधून मधून भेटवस्तू देऊन आपल्या भगिनी ताराबाई बद्दलचे प्रेम व्यक्त करणे, कुटुंबातील अन्य व्यक्तिविषयी आपुलकी ठेवणे, नोकर चाकरांशी वागताना भारदस्त अंतर ठेवणे आणि कारभारात स्वच्छंदपणे हस्तक्षेप न करणे' अशा प्रकारचे बोधपर व्याख्यान झाले. बडोद्यातील कट कारस्थानांपासून कटाक्षाने सावध राहण्याचा इशारा सुद्धा त्यांना देण्यात आला. दसरा दरबारासारख्या सार्वजनिक समारंभाखेरीज अन्य प्रसंगी भेटवस्तू वा नजराणे न स्वीकारण्याचा इशारा मेलव्हिलने दिला. न्यायदानाच्या रीतसर कारभारात ढवळाढवळ न करण्याबद्दलही उपदेश केला गेला होता.

त्यानंतर इतरही व्याख्याने झाली. सरसुभे काझी शहाबुद्दिन जमीन महसुलावर तर अण्णा भिवराव ताम्हणे हिशेब व्यवस्थेवर बोलले. न्यायमूर्ती गाडगीळ व ठाणावाला यांची कायदेकानूंसंबंधी माहिती देणारी भाषणे झाली. पेस्तनजी जहांगीरजी तल्यारखान यांनी सर्वेक्षण, जमाबंदी आणि लष्करीबाबी यांची माहिती दिली, तर विनायकराव किर्तने पोलीस आणि तुरूंग व्यवस्थेवर बोलले. ही व्याख्याने अतिशय वरच्या श्रेणीची मानली जातात.

उदा. ''ब्रिटीश रेसिडेंटशी कसे वागावें, आपल्या हक्कास कसे जपावे, दिवाणगिरी कोणास द्यावी, अधिकारी नेमतांना कोणते धोरण डोळ्यापुढे ठेवावे, नोकरचाकरांशी, हुजऱ्यांशी स्वतःच्या कुटुंबियांशी व आप्तस्वकीयांशी कसे वागावे व त्यांच्याकडून आपली कामे कशी करून घ्यावीत, भेटीस येणाऱ्या मंडळीपैकी कोणास जवळ करावे व कोणास दूर करवे, सार्वजनिक पैशाचा व्यय कसा करावा, शिल्लक कशी

व कोठे गुंतवावी सार्वजनितक कार्यास किती व कशी मदत करावी, वर्तमानपत्रे कोणती व केव्हा वाचावीत, इतर संस्थानांचे व ब्रिटिश रियासतीचे वार्षिक अहवाल वाचल्याने कोणते फायदे होण्यासारखे आहेत व (त्यांच्यापासून) आपणास काय शिकावयाचे इ. महत्वाची माहिती सर टी. माधवरावांनी आपल्या शिष्यास या व्याख्यानाद्वारा करून दिली.

उदा. शिक्षणा संबंधी

"At first at least the school fees should be fixed low, so that education may be availed of to the largest extent. As education comes to be more valued as the demand for it increases the scale of fees may be raised gradually."

"In India at least, it is evident that the state should take an active and leading part in the education of the people. If the state did nothing, the people themselves would do very little in the cause of puclic education" (Page-215) [14]

या समग्र व्याख्यानमालेत सर टी. माधवरावांनी स्वतः सादर केलेली मायनर हिंटस (किरकोळ सूचना).

या सदरातील उपदेशात्मक उपव्याख्यानमाला सर्वोत्कृष्ट असल्याचे महाराजांनी खास नमूद केले. उदा. त्यातील बाबी राज्याची सूत्रे हाती घेणाऱ्या राजासच नव्हे तर समस्त अधिकारी वर्गास उपयुक्त ठरतील असे मत त्यांनी जाहीरपणे व्यक्त केले. त्यात क्षुल्लक बाबींपासून ते गहन आणि सूक्ष्म बाबींपर्यंत अनेक विषयांची छाननी करून, हाती अधिकार असणाऱ्याने केव्हा आणि कसे वागावे या विषयी मोलाच्या सूचना होत्या. अठरा वर्षाच्या कोवळ्या राजासाठी ही व्याख्यानमाला तयार केली गेली होती. म्हणून त्यात साधी सरळ आणि रसाळ भाषा होती. त्यामुळे या किरकोळ सूचना रटाळ झाल्या नाहीत. दिवाणसाहेबांची ही भाषणे 'राजा कालस्य कारणम्' या प्रसिद्ध सुभाषितावर आधारलेली होती. विश्वस्ताच्या भूमिकेतून राजाने प्रजेच्या कल्याणासाठी झटावे असा त्यात रोख होता. प्रशासनाच्या चांगल्या तत्त्वांचे विवरण करताना सरकार, नोकरशाही आणि रेसिडेंट यांच्याशी राजाचे संबंध कसे असावेत, सार्वभौम सत्तेचा सल्ला नाकारल्याने होणारे संभाव्य दुष्परिणाम

वगैरे विषयांची माहिती त्यात होती. मल्हाररावांचे उदाहरण देऊन राज्याच्या महसुलाच्या दहा टक्क्यांहून अधिक रक्कम खाजगी व्यवहारात खर्च करण्याचा हक्क राजास नाही, याची खास जाणीव करुन देण्यात आली होती. सकारचा सल्ला हा वास्तवात हुकूम असल्याने त्याची तामिली गरजेची असते, हे विविध रीतीने सूचित केले होते.

प्रशिक्षण घेत असतानाच त्यांना प्रवासाचे अनेक प्रसंग आले. दत्तक विधान झाल्यावर त्याच वर्षी नोव्हेंबर महिन्यात इंग्लंडच्या राजगादीचे युवराज (आठवा एडवर्ड) मुंबईस यायचे होते. त्यांच्या स्वागतासाठी ऑक्टोबर महिन्यात ते मुंबईत गेले. सव्वीस दिवसांच्या मुक्कामात मुंबईचे गव्हर्नर सर फिलिप वुडहाऊस, लॉर्ड नॉर्थब्रुक व इतर शाही पाहुण्यांशी त्यांच्या औपचारिक गाठीभेटी झाल्या. नंतर प्रिन्स ऑफ वेल्स बडोदा भेटीस आले. तोवर युरोपियन भाषा व जीवनशैली पुरेशी आत्मसात झालेली नसल्यामुळे आगतस्वागतात सयाजीरावांना प्रमुख भूमिका बजावता आली नाही.

नंतरच्या वर्षी त्यांना दिल्लीस जाण्याची संधी लाभली. व्हाइसरॉय लॉर्ड लिटनने, राणी व्हिक्टोरियास हिंदुस्थानची महाराणी घोषित करण्यासाठी 1877 सालच्या नववर्षदिनी भव्य समारोह आयोजित केला. त्या निमित्ताने, ते डिसेंबरच्या उत्तरार्धात दिल्लीत गेले. त्यावेळी लवाजम्यात, शाही इतमामास साजेशा असामी होत्याच, शिवाय हत्ती, उंट आणि बैल असे 182 प्राणी सुद्धा होते. दिल्लीच्या राजरस्त्यावर त्यांनी बडोदे राज्याच्या वैभवाची चुणूक दाखविली. या प्रसंगी सयाजीरावांना 'ब्रिटिश साम्राज्याचा लाडका सुपुत्र' (फर्जंद-इ-खास-इ-दौलत-इ-इंग्लिशिया) हा किताब देण्यात आला. शिवाय कित्येक संस्थानी अधिकाऱ्यांनाही निरनिराळे किताब मिळाले. महाराजांनी परत येताना आग्रा, लखनौ, बनारस, आणि अलाहाबाद या शहरांना भेटी दिल्या.

उत्तर हिंदुस्थानच्या या सफरीला एक महिना आणि सव्वीस दिवस लागले. जुलै 1877 मध्ये जमनाबाईंना 'क्राउन ऑफ इंडिया' असा सन्मान देण्यात आला. याच काळात त्यांचे प्रिय जन्मदाते काशीराव यांचे 26 जुलै रोजी निधन झाले.

सयाजीराव महाराजांच्या प्रगतीवर खूष असलेल्या राजमातेच्या मनात त्यांच्या विवाहाचा विचार घोळू लागला. त्या आधी युवराज्ञी ताराबाईचा विवाह होणे महत्त्वाचे होते. तेव्हा 'वर संशोधन', 'वधू

संशोधन' एकदमच सुरु झाले. या कार्यासाठी दिवाण स्वतः जातीने सिद्ध झाले. ताराबाईचा वाङ्‌निश्चय सावंतवाडीच्या रघुनाथराव सरदेसायांशी झाला, तर सयाजीरावांचा विवाह तंजावरच्या राजघराण्याचे आप्त हैबतराव मोहिते यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी ठरला. 21 डिसेंबर 1879 रोजी ताराबाईचा विवाहसोहळा पार पडला. पुढे पंधरवड्यानेच 6 जानेवारी 1880 रोजी सयाजीरावांचा विवाह साजरा झाला. वधूचे नाव चिमणाबाई असे ठेवण्यात आले. महाराणींसाठी नव्या महालाची निर्मिती सुरु झाली, पण या राजप्रसादाचे बांधकाम पूर्ण होण्यापूर्वीच त्यांचे निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ नव्या प्रासादास 'लक्ष्मीबाई पॅलेस' असे नाव देण्यात आले.

सयाजीरावांचे शिक्षण पूर्ण झाले होते तसेच त्यांचा विवाह ही झाला होता, तेव्हा जमनाबाईंनी सयाजीरावांकडे गादीचे सर्वाधिकार सुपूर्द करण्यासाठी हिंदुस्थान सरकारकडे अर्ज केला. दिवाण सर टी. माधवराव, गव्हर्नर जनरल यांचे प्रतिनिधी व दिवाणांच्या अन्य सहकारी यांच्या दक्षतेमुळे प्रशासन सुनियंत्रित झाले होते. तसेच गतिशील, संपन्न आणि कल्याणकारी राज्याची पायाभरणीही झाली होती. दिवाण सर टी. माधवराव यांना इ.स. 1887 साली दिल्लीस 'राजा' हा किताब मिळाला होता.

आपल्या चार वर्षांच्या काळात कारभार यशाच्या वाटेवर नेल्यामुळे इ.स. 1879 पर्यंत माधवरावांचे वर्चस्व खूप वाढले होते. ब्रिटिश सरकारच्या नजरेत खुपावे इतके ! सयाजीराव अठरा वर्षाचे होण्याच्या सुमारास माधवरावांनी महत्त्वाचा खरडा सरकारकडे मंजुरीसाठी पाठवला. संस्थानिकांच्या हक्कांवर टाच आणणारा, दिवाणांचे महत्त्व वाढविणारा ! पण पुढे राजमातेच्या मनात शंकेची पाल चुकचुक लागली. दिवाणाचे महत्त्व वाढणे सरकारला नको वाटेल हे राजमातेस उमगले. माधवरावांची योजना सरकारला पसंत पडणार नाही, अशी त्यांना अटकळ होती म्हणून या संधीचा फायदा घेत, स्वतःच्या अखत्यारीत, सयाजीराव सज्ञान होत असल्याची जाण करवणारा विनंती अर्ज सरकारला पाठवला. या सर्व प्रयत्नांत त्यांना एलियटचे विशेष साहाय्य झाले. सर्वोच्च राजसत्तेने 28 डिसेंबर 1881 रोजी सयाजीरावांच्या हाती सत्ता देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे दिवाणसाहेबांना आश्चर्याचा धक्का बसला. जवळजवळ सहा वर्षे ते राजपदच उपभोगत होते. परंतु परिस्थितीशी जुळवून घेऊन आपल्या या दुय्यम स्थानाशी त्यांनी काही काळ तडजोड

केली. त्यांनी सयाजीरावांच्या नजरेत कारकिर्दीच्या प्रारंभापासून सर्वार्थाने 'आपल्या राज्याचे आपण स्वामी रहायचे' हा निश्चय चाणाक्ष नजरेने टिपला आणि दिवाणपदावरून आपणहून दूर होण्याचा निर्णय घेतला.

सयाजीरावांच्या हातात बडोदे संस्थानाची सत्ता अधिकृतपणे 28 डिसेंबर 1881 रोजी सुपूर्द करण्यात आली. मोठ्या थाटामाटाने आणि आनंदोत्सवपूर्वक हा सोहळा पार पडला. या प्रसंगी व्हाइसरॉय येऊ शकले नाहीत, पण त्यांनी पत्राद्वारे महाराजांना अभिनंदन पाठविले. व्हाइसरॉयनी आपल्या पत्रात ''उच्च पदाभोवती असणाऱ्या धोक्यां''बद्दल तरुण राजाचा सावध राहण्याचा इशारा दिला होता, तर गव्हर्नरांनी केलेल्या भाषणात स्वकर्तव्य निष्ठेने पार पाडल्यामुळे होणाऱ्या लाभांचा उल्लेख केला.

या प्रसंगी सयाजीराव महाराजांनी इंग्रजीत भाषण केले. आपल्या उत्तरात सयाजीरावांनी सर रिचर्ड मीड, पी.एस्. मेलव्हिल व राजा टी माधवराव यांचा उल्लेख करुन त्यांनी बडोदे संस्थानासाठी जी मोलाची कामगिरी बजावली होती, तिच्याबद्दल धन्यवाद दिले. सर रिचर्ड मीड यांनी संस्थानात नवा जमाना सुरु केल्याची नोंद घेऊन, त्यांनी आखून दिलेल्या व्यापक राजमार्गास अनुसरुन सुरक्षितता, समृद्धी व प्रतिष्ठा यांच्या मार्गावर संस्थानचा पुढचा प्रवास यशस्वी झाला, असे आवर्जून सांगितले. हे भाषण खुद्द महाराजांनी तयार केलेले नव्हते. तरी पण त्यातील चतुर्विध उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सयाजीरावांच्या राजवटीत जे प्रयत्न झाले त्यावरुन या भाषणांमधील सयाजीरावांचा दृष्टिकोन स्पष्टपणे जाणवत होता. साडेसहा वर्षाच्या प्रशिक्षणानंतर, सयाजीराव महाराजांच्या हाती राजसूत्रे आली. त्यांनी जे काही ज्ञान संपादित केले होते ते केवळ तात्त्विक पातळीवरचे होते. त्यांच्या अंगचे दोन गुण म्हणजे कार्यकनिष्ठा आणि चिकाटी हे गुण प्रकर्षाने दिसू लागले होते. शिवाय त्यांच्या वर्तनात एलियटचा प्रभाव नजरेत भरण्याइतका जाणवत असे. एलियटच्या प्रभावामुळे महाराजांना नियमपालन आणि काटेकोर शिस्त यांचे महत्त्व समजू लागले. त्यांनी बडोदे राज्य म्हणजे जणू एक प्रयोगशाळाच बनविली. प्रयोगांचा पाठपुरावा करीत आपल्या कल्पना साकार करण्याच्या दृष्टीने सन् 1925 मध्ये त्यांनी आपल्या एका सहकाऱ्याला म्हटले होते की ''माझ्या जीवनात ढिलेपणाला, विश्रांतपणाचा वाव राहिलेला नाही''. [15] त्यांचे व्यक्तित्त्व म्हणजे मूर्तिमंत काम. राज्य करणे हे त्यांचे वेड आणि सत्ता हा त्यांचा जणू आत्माच होता. त्यांना प्रत्यक्ष राज्यकारभाराचा अनुभव नव्हता. कारणपरत्वे

प्रवास घडले असले तरी स्वतःच्या संस्थानाची पाहणी करून राज्याचा परिचय करुन घेणे त्यांना जमले नव्हते. म्हणून त्यांनी प्रथम संस्थानात फिरून शासनयंत्रणेचा प्रत्यक्ष परिचय करुन घेण्याचे ठरविले. हक्क आणि कर्तव्य यांची जुळणी कागदावर पाहणे आणि ती प्रत्यक्षात 'दिसणे' यातला फरक कळला तर राज्याची खऱ्या अर्थाने ओळख होईल, असे त्यांना वाटले. हे ज्ञान खरोखर त्यांना अधिक परिणामकारक ठरले. कार्याचा अनुभव घेत ते झपाट्याने विकसित होऊ लागले.

गुजराती जनतेवर राज्य करताना, गुजरात्यांचा खास स्वभाव गुण त्यांनी आत्मसात केला. आपपर भाव न ठेवता समस्त प्रजेचे ते पालक ठरले. पूर्वग्रह तसेच फोल रुढींचा त्यांना तिटकारा होता. बुद्धी आणि चारित्र्यसंपन्नता या गुणांना ते विशेष महत्त्व देत असत. सतर्क हुशारी व प्रेरणा शक्ती यांच्या बळावर त्यांनी आपल्या राज्याचा चेहरा मोहराच बदलून टाकला. राज्याच्या प्रगतीच्या आड येणाऱ्या शक्तींचा कठोरपणे नायनाट व राज्याचे हित करू पहाणाऱ्या शक्तींना प्रोत्साहन देणे, ही त्यांची कार्यप्रणाली होती. विविध प्रातांची तसेच प्रजेची सत्यस्थिती जाणण्यासाठी त्यांनी संस्थानातील विविध प्रांतात 'हुजूर सवारी' नावाने दौरे काढले. उत्तर गुजरातेत कडी परिसराच्या दौऱ्याने या शुभ संकल्पनेचा प्रारंभ झाला. आपल्या संपूर्ण कारकिर्दीत त्यांनी पस्तीस वेळा हुजूर सवारी काढली. अशा प्रकारच्या दौऱ्यात महाराजांची वाट अडवून, मध्येच, सामान्य माणूसही त्यांना आपली गाऱ्हाणी सांगू शकत. महाराज त्यांची तक्रार ऐकून घेत व शक्य असल्यास प्रश्नांचा त्वरीत निकाल लावीत. सर्व नागरिकांना समान संधी आणि समान वागणूक देण्याबद्दल त्यांची ख्याती होती. हुजूर स्वारींच्या अधिकृत दौऱ्यांव्यतिरिक्त ते वेश पालटून रात्री-अपरात्री प्रजेच्या परिस्थितीचे निखळ चित्र प्राप्त करण्यासाठी बडोदे शहरात फिरत असत असे म्हटले जाते.

''हिंदुस्थानात आतापर्यंत दोनच खरे राजे झाले, व ते म्हणजे शिवाजी महाराज व सयाजीराव महाराज'' असे प्रसिद्ध मुत्सद्दी चक्रवर्ती राजगोपाळाचारी म्हणत. तसेच इतिहासाचार्य वि. का. राजवाडे म्हणत की हिंदुस्थानात सध्या प्रगल्भ बुद्धीचे तीनच मुत्सद्दी आहे, आणि ते म्हणजे लोकमान्य टिळक, न्यायमूर्ती रानडे आणि श्रीमंत सयाजीराव गायकवाड !''[16] सुव्यवस्था, तात्त्विक भूमिका आणि गुणवत्तेची श्रेणी यांवर महाराज अधूनमधून भर देत. सयाजीरावांचे गुरु एलियट हे 1882 साली त्यांच्या इच्छेविरुद्ध

बडोदे सोडून गेले होते, पण रेसिडेन्सी आणि ब्रिटिश नोकरशाही यांच्यापैकी कित्येकांचा रोष पत्करुनही महाराजांनी त्यांना परत बोलावून घेतले. एलियट बडोद्यात येताच महाराजांनी त्यांना सर्वेक्षण आणि जमाबंदीचे खाते सोपवले. एलियट यांच्या कार्यतत्परतेमुळे बडोदे संस्थानात प्रथमच शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहणीपद्धत सुरु झाली व भावी सुधारणांसाठी जरुर ती भूमिका तयार झाली. अनुभवाने उत्तम ठरलेल्या रयतवारी - पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

संस्थानात धार्मिक कार्यासाठी तसेच चांगल्या कामाच्या बक्षिसाच्या रूपात भूखंडदान केले जाई. अशा भूखंडांना 'बारखळी'जमिनी म्हणत त्यावर नामपत्र कर असे. पण या दानाचा उपयोग उपयुक्त कामांसाठी होत नसे. अशा जमिनी बहुतेक बळकावलेल्या होत्या. सन् 1875 च्या प्रारंभी असे आढळून आले की, राज्यातील दहा टक्के खेडी प्राय:करमुक्तच होती. परिणामी, राज्याचे उत्पन्न खूप कमी झाले होते. हे सुधारण्याचे काम एलियटला करावे लागले. त्यांनी या कामासाठी एलियटला कमिशनरचे पद बहाल केले. 1889 साली यासंबंधी कायदाच करण्यात आला.

या सुधारणांचा फायदा शेतकऱ्यांच्या दृष्टीने विशेष होण्यासारखा होता. जमाबंदीची नवी पद्धत सुरु करून त्यांनी शेतकऱ्यांना सुरक्षितता प्राप्त करुन दिली. शेतकऱ्यांचे हक्क प्रस्थापित झाले. जमिनीच्या प्रतवारीनुसार न्याय्य कर आकारणी सुरु झाली. त्यायोगे कुळांची परिस्थिती पूर्वीपेक्षा कितीतरी सुधारली. कर किती आणि केव्हा भरायचा याचा अंदाज आल्याने शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली.

तरूण महाराजांच्या वर्तनात उत्साह होता. राज्यकारभाराच्या पद्धतीत सुधारणा करण्यास ते उत्सुक होते. राज्यकारभाराची यंत्रणाही सुधारण्यात आली. सुटी सुटी कागदपत्रे, फायली, आणि लाल फीत या ऐवजी दैनंदिन कारभारात महाराजांनी 'टिपण-पद्धती' सुरू केली. प्रशासनाचे विक्रेंदीकरण सुरू झाले. त्यांनी आधुनिक पद्धत अंमलात आणण्याचा आग्रह धरला. त्यांनी खाजगी कार्यवाह नेमून विविध खात्यांवर खाते प्रमुख नेमले. त्यांच्याकडून ते साप्ताहिक अहवाल मागवत. कायद्यात एकसूत्रीपणा यावा तसेच कायद्याचे मुद्दे लेखी उपलब्ध व्हावेत यासाठी त्यांनी कायदा समिती स्थापना केल्या. 1884-85 साली त्यांनी महसूल खात्यापासून हिशेब व हिशेब तपासणी खाते वेगळे केले. रजिस्ट्रेशनची नोंदणी पद्धत अंमलात आणली.

निवडक तालुक्यात अंमल बजावणीचे अधिकार आणि न्यायाधिकार वेगवेगळे केले.विहिरी खोदण्याच्या कार्याला विशेष महत्त्व दिले. रस्त्यांचा आखणीसाठी सर्वेक्षण करुन बारमाही वाहतुकीस उपयुक्त होतील असे रस्ते बांधण्याचे हुकूम सोडले. जकातीची नवी पद्धत सुरु करण्यात आली.

सन् 1880 पासून सुरू झालेल्या दशकात इतर कित्येक महत्त्वाच्या घटना घडून आल्या. 'हुजूर स्वारीने' कडी, नवसारी, बडोदे व अमरेली या प्रांताचा दौरा केला. 1883 ते 95 या कालावधीत विविध कारणपरत्वे अहमदाबाद, कलकत्ता, काशी, अलाहाबाद, आग्रा, ग्वाल्हेर, अजमेर, पुणे आणि जोधपूर या शहरांना भेट देण्याची संधी मिळाली. ब्रिटीश मुलखातील तसेच संस्थानातील शासनपद्धतीची प्रत्यक्ष माहिती करून घेण्यासाठी या भेटींचा उपयोग झाला. याच काळात उद्योगधंद्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले. सन् 1882 साली 'बडोदे कॉटन स्पिनिंग ॲन्ड वीव्हिंग' मिल सुरु झाली, तर 1885 मध्ये सरकारी साहाय्याने गणदेवी येथे एक साखर कारखाना सुरु करण्यात आला. 1883-84 साली तुरुंगातील कैद्यांसाठी आठवड्यातून एकदा 'सर्वसामान्य नीतिमत्ता व सद्वर्तन' यांवर व्याख्याने आयोजित करण्याची व्यवस्था केली.

1885 सालातील जानेवरी महिन्यात गव्हर्नर जनरलचे एजन्ट वॉटसन सपत्नीक बडोदा भेटीस येण्याचे ठरले. ही संधी साधून महाराजांनी लेडी वॉटसन् यांच्या हस्ते, बडोदे पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन करावे असे ठरले. बडोद्याच्या प्रजेला पिण्याचे चांगले पाणी पुरविण्याच्या प्रश्नाचा विचार खंडेराव आणि मल्हारराव या राजांनीही गंभीरपणे केलेला होता.खंडेरावांनी नर्मदेचे पाणी आणण्याची तर मल्हाररावांनी माहीनदीचे पाणी आणण्याची योजना आखली होती. या प्रकल्पासाठी खर्चाची रक्कमही बाजूला ठेवली होती. या दोन्ही योजना काही कारणांमुळे अंमलात आल्या नव्हत्या. सावली तालुक्यात दौऱ्यावर असताना अखेर सयाजीरावांना मार्ग मिळाला : 'सयाजी सरोवर' ची कल्पना प्रत्यक्षात उतरली. आज हे सरोवर 'आजवा लेक' म्हणून प्रसिद्ध आहे. या योजनेसाठी पाच वर्षांचा कालखंड व चौतीस लक्ष रुपये खर्च झाले. हा प्रकल्प लाभदायकही ठरला. या योजनेच्या यशामुळे 1926 च्या सुमारास त्यापासून वार्षिक 70,000 रू. उत्पन्न मिळू लागले.

इ.स. 1886, अखेर लॉर्ड डफरीन यांच्या हस्ते 'काउंटेस ऑफ डफरिन' या रुग्णालयाचे उद्घाटन झाले. या सुंदर इमारतीचा आराखडा, मेजर सी. मँट यांनी तयार केला. त्यासाठी साडेतीन लाख रू. खर्च

आला. पश्चिम हिंदुस्थानातील सर्वोत्कृष्ट रुग्णालय म्हणून त्याची ख्याती झाली. पौर्वात्य आणि पाश्च्यात्य वैद्यकीय ज्ञानाचा समन्वय साधला जावा म्हणून महाराजांनी 1888-89 साली मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजला 'क्लिनिकल मेडिसिन आणि फार्माकॉलॉजी' या विषयावरील प्राध्यापकपदाचे एक अध्यासन निर्माण करण्यासाठी आर्थिक सहाय्य केले.

याच वर्षी बडोद्यात पहिल्या नियतकालिकाचा 'बडोदावत्सल' चा जन्म झाला. प्रकाशन नीटसपणे सुरू झाले. त्यांच्या चालकांत मतभेद उत्पन्न झाल्याने 1892 साली ते बंद करावे लागले. त्यानंतर दामोदर यंदे उर्फ सावळाराम यांनी 'श्री सयाजी विजय' नावाचे आणखी एक पत्र सुरू केले. दैनिकाच्या मुद्रणालयाच्या उद्‌घाटनासाठी महाराज जातीने हजर राहिले.

इ.स. 1882-83 सालच्या सोनगढ 'हुजूर सवारी'त, महाराजांनी तेथे शाळा उघडण्याची किती आवश्यकता आहे याची नोंद घेतली. हा परिसर अत्यंत मागासलेला! ह्या मागासलेपणावर शिक्षणप्रसार हाच रामबाण उपाय होता, म्हणून तेथे एक शाळा व वसतिगृह बांधण्याचा आदेश निघाला आणि त्या परिसराला सोनगढचे 'धनका वसतिगृह' असे नाव देण्यात आले. एका वेगळ्या प्रकारच्या विभक्तिकरणामुळे शिक्षणापासून वंचित राहणारा समाजाचा आणखी एक वर्ग म्हणजे सरदार लोकांचा. सरदारांचे पुत्र अशिक्षित, अडाणी राहतात. या प्रकारची समस्या सोडविण्यासाठी सर टी. माधवराव यांनी बडोद्यात 'सरदार स्कूल' सुरु केले. त्या नमुन्यावरच महाराजांनी तातडीने राणीपरज ही शिक्षण संस्था निर्माण केली. मल्हाररावांच्या राजवटीत 1871 मध्ये बडोद्यात फक्त एक हायस्कूल व चार प्राथमिक शाळा होत्या. त्यातील दोन मराठी व दोन गुजराती होत्या. तसेच शहरात चार संस्कृत पाठशाळा होत्या. आणि पेटलाद येथे एक इंग्रजी शाळा होती. 1875 मध्ये शिक्षण खाते स्थापना झाले आणि योजनाबद्ध प्रगतीसाठी त्याचे कार्य अधिक कार्यक्षमतेने व्हावे, यासाठी 1884-85 मध्ये त्याची पुनर्रचना करण्यात आली. शिक्षक तयार करण्यासाठी एक ट्रेनिंग स्कूल सन् 1886 साली सुरु करण्यात आले. भारतीय संगीताचे शिक्षण देणारी शाळाही अस्तित्वात आली.

त्यांनी शिक्षणक्षेत्रात महत्त्वाचा प्रयोग 1885 साली सुरु केला. प्रयोगाच्या सुरुवातीस त्यांनी आपले मनोगत प्रकट केले होते. ''दरवर्षी तीस शाळांची निर्मिती करावी. त्या इमारतींच्या निर्मितीसाठी साठ हजार रुपयांची सोय व्हावी. मुलींनी शाळेत यावे, यासाठी डोळस प्रयत्न व्हावेत. या प्रयत्नांचा भाग म्हणून शाळेत शिक्षिका अधिक ठेवण्यावर भर दिला जावा. तसे केल्यामुळे पालकांना आपल्या मुलींना शाळेत पाठवणे सुरक्षित वाटेल, तसेच मुलींना शाळेत पाठवण्याची कार्यवाही व्हावी. केवळ पुस्तकी ज्ञानावर भर न ठेवता, कार्यानुभवाचे महत्त्व जपले जावे. शारीरिक शिक्षणाचीही व्यवस्था व्हावी. अभिजात इंग्रजी साहित्याच्या अनुवादाच्या कामासाठी विद्वानांची नेमणूक व्हावी. नगरात ग्रंथालयांची संख्या वाढवावी. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा उपयोग करण्याची सवय लावावी.ग्रंथालयात वावर असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे. अज्ञानांधकारावर मात करण्यास, साक्षरांनी कंबर कसावी..'' [17]

अमरेली जिल्ह्यात सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा उपक्रम यशस्वीरीत्या सुरू झाला. ही गोष्ट शैक्षणिक क्षेत्राला नवे वळण देणारी ठरली. सन् 1906 पर्यंत हा उपक्रम सर्व संस्थानव्यापी बनला. या बाबत बडोदा गॅझेटियरने असा दावा केला तो अगदी योग्यच आहे. ''उर्वरित हिंदुस्थानात लोकांना सक्तीचे व मोफत शिक्षण देणे आवश्यक असून ते साध्य करणे कसे सोपे नाही, असा विचार सुरू होण्याच्या कितीतरी आधी, बडोद्याच्या गायकवाड महाराजांनी आपल्या राज्यात शिक्षण क्षेत्रातला हा उपक्रम सुरू केला होता आणि समोर दुर्लंघ्य अडचणी असूनही त्यांनी प्रत्यक्षात तो यशस्वी रीतीने तडीस नेला होता''. [18]

अखिल भारतातला हा आद्य प्रयत्न होता. या अनुभवाच्या बळावर 'कलाभवन' नामक आणखी एक संस्था स्थापन करण्यात आली. 1890 साली ती सुरू झाली आणि लवकरच त्यात उपयोजित कलांचे शिक्षण देण्यात येऊ लागले. तांत्रिक शिक्षणाच्या शाखेच्या प्रारंभीच्या अभ्यासक्रमात चित्रकला, सुतारकाम, रंगकाम, ब्लीचिंग व कॅलिको प्रिंटींग तसेच मेकॅनिकल इंजिनियरिंग यांचा समावेश होता. नंतर मृत्तिकाशिल्प, शिल्पकला, वास्तुकला, स्थापत्यकला, अन्य ललितकला, वस्त्रोद्योग आणि रसायन तसेच तंत्रज्ञानाच्या अन्य शाखाही अभ्यासक्रमात समाविष्ट होत गेल्या. संस्थेचे समर्थ व कल्पक संचालक प्रो. के. टी. गज्जर यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची चांगलीच भरभराट झाली. जुलै 1896 मध्ये त्यांनी संस्थानाच्या अन्य भागांत

वस्त्रोद्योगाच्या कार्यशाळा उघडल्या होत्या, तसेच या कामासाठी शिक्षक तयार करण्यासाठी एक प्रशिक्षण केन्द्रही त्यांनी सुरु केले होते. खुद्द महाराजांनी कल्पनाही केली नव्हती इतका कलाभवन या प्रकल्पाचा व्याप वाढला होता आणि तो यशस्वीही झाला होता.

कलाभवनानंतर लवकरच बडोदा म्यूझियम सन् 1894 मध्ये अस्तित्वात आले. युरोपच्या दौऱ्यात याची कल्पना सुचलेली होती. म्यूझियममधील वस्तुसंग्रहात भारतातील तसेच युरोपातील प्रेक्षणीय वस्तू आहेत. येथील चित्रसंग्रह हा तर हिंदुस्थानातील एक उत्कृष्ट संग्रह मानला जाऊ लागला. कलाभवन व म्युझियम यांचे संकल्पन मिस्टर चिशोम या इंग्रज गृहस्थानी अत्यंत पद्धतशीर रीतीने केलेले होते. चिशोम यांनी हायस्कूल व कॉलेज यांच्या लाल दगडांच्या इमारती बांधल्या. सूरसागर तलावाच्या ज्या किनाऱ्यावर म्युझिक कॉलेज बांधण्यात आले होते, त्याच बाजूस कोपऱ्यावर लाल फत्तरांनी एक उत्कृष्ट इमारत बांधण्यात आली. मुळात ही वास्तू बांधली होती मंडईसाठी ! ती इतकी देखणी झाली की महाराजांनी मंडईचा विचार रद्द करून तिथे न्यायमंदिराचे काम सुरू करण्याचा निर्णय घेतला. सन् 1892 पर्यंत 118 मैलांचे लोहमार्ग (रेल्वे) तयार होऊन राज्यातील अनेक प्रमुख ठिकाणे बडोदे या राजधानीला जोडली गेली. बडोद्यातील रस्तेही रुंद करण्यात येऊन ठिकठिकाणी उद्याने उभारण्यात आली. मंडईची वास्तू न्यायालयास दिल्यामुळे राजमहाल रोड वर एका प्रशस्त देखण्या वास्तूची निर्मिती करुन मंडईची उत्तम व्यवस्था करण्यात आली. खंडेराव मार्केट या नावाने ही वास्तू आजही प्रसिद्ध आहे.

बडोद्याची जडणघडण करणाऱ्या अखिल हिंदुस्थानी गुणीजनांच्या येथे मेळाच भरला होता. सयाजीरावांच्या रत्नपारखी स्वभावाची कीर्ती ऐकून अनेक नामवंत लोक त्यांच्याकडे आले. बंगाली, मद्रासी, पंजाबी, इंग्रज... सारे स्वेच्छेने बडोद्यास आले. महाराजांनीही त्याचे स्वागतच केले. महाराजांची राजवट चालू असतानाच दिवाण बहादूर अंबालाल साकरलाल देसाई, आणि पुढे राष्ट्रसभेतील नेते म्हणून प्रसिद्ध झालेले अब्बास तय्यबजी हे दोघे बडोद्यात आले होते. पुढे एक थोर राजकारणी सर मनूभाई मेहता आणि नामवंत इतिहासकार दिवाण बहादूर गोविंद सखाराम सरदेसाई बडोद्यास आले आणि पस्तीस वर्षे बडोद्याचे होऊन राहिले. राष्ट्रीय आंदोलनात चमकलेले अरविंद घोष, खाशेराव जाधव, आणि केशवराव

देशपांडे हे ही त्यानंतर बडोद्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे ही काही काळ बडोद्यात होते. प्रो. के.टी. गज्जर, पुढे राष्ट्रसभेचे अध्यक्षस्थान भूषविणारे मौलाना महंमद अली तसेच टोमस तेत व प्रो. हॅरॉल्ड लिट्लडेल यांच्यासारखे बडोदा महाविद्यालयाशी संबंधित असलेले अनेक विद्वान बडोद्यात आले. प्रसिद्ध 'रविकिरण' मंडळाचे घटक कवी माधव जूलियन, कवी चंद्रशेखर यांनासुद्धा महाराजांचा वरदहस्त लाभला.

इ.स. 1895 ते 1900 हा काळ अगदी कसोटी पाहणारा ठरला. पहिला उमेदवारीचा काळ संपतो, तोच महाराजांना अनेक संकटाना सामोरे जावे लागले. या पांच वर्षात अनेक आघात महाराजांना सहन करावे लागले. राज्यकारभारात उगाच ढवळाढवळ करणाऱ्या बडोद्याच्या रेसिडेंटशी महाराजांचा प्रथम खटका उडाला आणि नंतर थेट व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांच्याशी महाराजांची चकमक झडली. कौटुंबिक जीवनात सुद्धा त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले. इ.स. 1897-98 साल प्रियजनांसाठी अनंताच्या प्रवासाचे आमंत्रण बनून आले. राजमाता आणि त्यांच्या पाठोपाठ भगिनी ताराबाई यांचे निधन झाले. 1896-97 सालची प्लेगची साथ, 1897-98 सालचा पिलबाईचा उठाव, गुजरातमध्ये 'छापानिओ' म्हणून प्रसिद्ध असणारा 1899 चा अभूतपूर्व दुष्काळ आणि 1900 मधील मंदीची लाट या घटनांनी प्रशासनाचा अंतच पाहिला.

आलेल्या संकटांना सामोरे जात बडोदे प्रशासनाने लवकरच त्यातून सुटकेचा मार्ग काढला. त्या दृष्टीने विसावे शतक सुधारणांच्या दृष्टीने सुवर्णयुगच ठरले. महाराजांनी एकंदरीत बरीच प्रगल्भता दाखविली. प्रशासनाला सर्वप्रथम चलनाचा प्रश्न हाती घ्यावा लागला. राज्यात 'बाबाशाही' नावाचे स्वतंत्र नाणे चलनात होते. दुष्काळामुळे खजिना रिकामा झाला होता. परिणामी, चलनाच्या विनिमय मूल्यात घट झाली. त्यामुळे ब्रिटिश हिंदुस्थानातील चांदीचे चलन स्वीकारण्याची जी सूचना पूर्वी अनेकवार करण्यात आलेली होती, तिचा विचार गंभीरपणे होऊ लागला. संस्थानला त्यात बराच तोटा सहन करावा लागणार असला तरी बऱ्याचश्या विचार विनिमया अंती पन्नास वर्षांच्या कालावधीसाठी चांदीचे चलन सन् 1900-01 मध्ये स्विकारले गेले.

इ.स. 1908, जुलै 20 रोजी 'बँक ऑफ बडोदा'ची स्थापना झाली. तिच्या शाखाही राज्यात सर्वत्र उघडल्या गेल्या. बँकेचे पहिले युरोपीय व्यवस्थापक सी. ई. रँडल हे होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेने

पहिल्या दिवसापासूनच उत्कृष्ट कामगिरी सुरू केली. पुढे देशातील आघाडीच्या पाच मान्यवर बँकांत या बँक ऑफ बडोदाचा समावेश होऊ लागला. जुन्या पद्धतींचे पुनरज्जीवन करण्याच्या उद्देशाने, महाराजांनी ग्रामपंचायत व्यवस्थेचा अंगिकार केला. आणि रयतवारी पद्धतीचा उपक्रम हाती घेतला. त्यातून सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन तालुक्यांची निर्मिती झाली. 1894 सालामध्येच निवडणुकांच्या द्वारा किमान शंभर खेडयात तरी ग्रामपंचायती स्थापन झाल्या पाहिजेत व तसे झाल्यास ''माझ्या राज्यात मी जे करू इच्छित आहे, त्याचा जणू कमानीचा शिलान्यासच बसविल्यासारखे होईल'',अशी त्यांची धारणा होती. एक हजार वा अधिक लोकसंख्या असणाऱ्या प्रत्येक खेड्यात, अर्धे नियुक्त व अर्धे निवडून आलेल्या सभासदांच्या ग्रामपंचायतींची स्थापना झाली. प्रत्येक जिल्हयात, आणि पोटजिल्हयात बोर्डे स्थापना करणारा, नागरिकास विशिष्ट श्रेणीबद्ध मतदानाचा अधिकार देणारा स्वराज्य कायदा त्यांच्या मनात होता; पण 1904 सालापर्यंत त्यास सरकारची मंजुरी मिळाली नाही. त्यामुळे या योजनेच्या व्याप्तीत विशेष वाढ झाली नाही, तरी पाचशे किंवा अधिक लोकवस्तीच्या प्रत्येक खेड्यांची एक ग्रामपंचायत अस्तित्वात आली व त्यांची एकूण संख्या 2103 झाली. पंचायतीतील दोन तृतीयांश सभासद निवडून आलेले असत. ते जमवत त्या रकमेइतके सरकारी अनुदान त्यांना मिळत असे. सरकारकडून सुलभ अटींवर कर्ज मिळण्याची व्यवस्था ग्रामपंचायतीस देण्यात आली.

सयाजीरावांचे एक चरित्रकार स्टॅन्ले राईस यांच्या अध्यक्षतेखालील एका समितीने 1928 साली लोकल बोर्डाच्या पुनर्रचनेच्या विचार केला. ब्रिटिश मुलखातल्या जिल्हा लोकल बोर्डाच्या धर्तीवर प्रांतपंचायतींचे अध्यक्षपद निवडणुकीने भरण्याची पद्धत सुरु करण्यात आली. बडोदे शहरात 1869 पासून नगरपालिका होती. सन् 1891 नंतर पाटण, नवसारी व पेटलाद या महत्त्वाच्या नगरातही नगरपालिका स्थापन झाल्या. 1903-04 पर्यंत बडोदे राज्यात पस्तीस नगरपालिका अस्तित्वात होत्या. सुरुवातीस त्यांचा खर्च सरकारमार्फत होत असे. पुढे कामाची व्याप्ती वाढून, त्या स्वतंत्रपणे कर आकारू लागल्या. महाराजांच्या मृत्यूपर्यंत त्यांची अ आणि ब गटात विभागणी झाली होती.

याच वर्षी बडोदे शहरासाठी नगर सुधार विश्वस्त मंडळ (City Improvement Trust) स्थापन करण्याचा विचार पुढे आला.मात्र प्रत्यक्ष स्थापना इ.स. 1910-11 सालात झाली. प्रो. गेडिस या नामवंत

नगररचना तज्ज्ञाच्या सल्ल्यानुसार नगराचे सौंदर्य वाढू लागले. शक्य तितक्या बंद गल्ल्या खुल्या झाल्या. दाट वस्तीच्या भागात छोटी छोटी उद्याने, आणि विश्रामस्थाने यासाठी मोकळी जागा राखण्यात आली. अरुंद रस्ते रुंदावण्यात आले. ग्रामीण विभागात सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व सिद्ध करण्याची सोय असलेले, आवश्यक सुखसोयींनी परिपूर्ण नमुनेदार घरकुल तयार करण्यात आले. हमरस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्याची योजना अमलात आणली. छायायुक्त राजमार्ग, पाणी पुरवठ्याच्या योजना आणि विजेचे दिवे यामुळे बडोद्याच्या परिसरातील प्रदेश अन्य आजूबाजूच्या प्रदेशाच्या तुलनेने उठून दिसे.

1904-05 साली सहकारी पतपेढया, धार्मिक विधी आणि कस्टम जकात या विषयी तीन महत्त्वाचे कायदे अंमलात आले. पुढे पतपेढ्यांच्या कामात वाढ झाली. म्हणून महाराजांच्या कारकिर्दीच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने 1925-26 साली मध्यवर्ती सहकारी पतपेढी स्थापना करण्यात आली. त्यात वाढ होऊन सत्तावीस सालच्या अखेरपर्यंत या संस्थांची संख्या हजाराहून जास्त झाली, तरी ग्रामीण भागातील समस्या काही कमी झाल्या नाहीत. म्हणून दिवाण रोमेशचंद्र दत्त यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायखात्याची व्यवस्था आणि अंमलबजावणी खात्याची व्यवस्था वेगवेगळी करण्यात आली. सन् 1904 साल हे प्रातिनिधिक सरकार स्थापन करण्याच्या चर्चेचे प्रारंभवर्ष ! प्रदीर्घ विचारांती, सन् 1908 मध्ये महाराजांनी 'धारासभा' या नावाचे कायदेमंडळाची रचना केली. त्यावेळी धारासभेत सतरा सदस्य होते. ही संख्या बारा साली वाढली. सरदार वर्गाचा व व्यापारीवर्गाचा प्रत्येकी एक, असे दोन प्रतिनिधी त्यात सामील झाले. 1927 साली धारासभेची सभासदसंख्या सव्वीस झाली. दिवाण आणि त्यांचे पाच अधिकारी, दहा नियुक्त सदस्य, सहा सरकारी व चार बिनसरकारी अधिकाऱ्यांचा त्यात समावेश असे. आणि दहा लोकांनी निवडलेले प्रतिनिधी अशी एकूण सदस्यसंख्या असे. बडोदे व कडी जिल्ह्यांतून तीन तीन प्रतिनिधी निवडले जात. नवसारी आणि अमरेली जिल्ह्यांतून दोन दोन प्रतिनिधींची निवड होई. 1917 साली तारतम्य ठेवून प्रश्न विचारण्याचा हक्क बजावण्याचा सल्ला महाराजांनी सभासदांना दिला. धारासभेच्या मतास महत्त्व देण्याचे सरकारवर बंधन नव्हते. त्यामुळे धारासभेने अमान्य केलेल्या कायद्याचीही सरकार अंमल बजावणी करू शकत असे. शिवाय सर्व कायदे मंजुरीसाठी धारासभेकडे पाठवले पाहिजेत असे बंधन सरकारवर नव्हते तरी

धारासभेच्या मान्यते अमान्यतेमुळे सरकारवर वचक निर्माण झाला. 1924-25 साली धारासभेस अर्थसंकल्पावर चर्चा करण्याचा अधिकृत हक्क मिळाला, पण त्यामुळे सरकार अडचणीत आले. म्हणून तो मागे घेण्यात आला तरीही पर्यायी संकल्पनांचे प्रयोग करून पाहण्याचा प्रयत्न महाराजांनी केला.

आपल्या राज्याचा आर्थिक पाया अधिक भक्कम करण्याकडे महाराजांनी सतत लक्ष पुरविले. त्या संदर्भात त्यांनी मुंबई सरकारचे एक आय.सी.एस. अधिकारी सी.एन.सेडन यांना मुद्दाम बडोद्यास बोलावून घेतले. त्यांना सर्वेक्षण व जमाबंदी खात्याच्या आयुक्ताचे स्थान दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आयकराची व्याप्ती वाढविण्यात आली. 1905-06 साली महसूल खात्यात 'व्यापार व उद्योग' हा विभाग स्थापन करण्यात आला. परिणामी सेडन यांचे काम खूप वाढले. म्हणून त्यांस स्वतंत्र खात्याचा दर्जा देण्यात आला. वर्ष अखेर आयात, निर्यात कर, तसेच जकातीचा कर सर्व राज्यात रद्द करण्यात आला. अमरेली जिल्ह्यात कोडीनार व ओखा मंडळात अंतर्गत सीमा शुल्काची वसुली पुन्हा सुरू करण्यात आली. या दोन घटना आणि 1908 साली झालेली 'बँक ऑफ बडोदा' ची स्थापना यामुळे बडोदे संस्थानाच्या प्रगतीचा वेग आणि ख्याती वाढली.

आपद्ग्रस्त काळात महाराजांनी केवळ वित्तिय समस्यांकडे लक्ष पुरविले असे नाही तर ते वेधक नजरेने सामाजिक समस्यांचाही परामर्श घेत होते. या क्षेत्रातले प्रश्न हाताळण्याच्या दृष्टीने एखाद्या परकीय सत्तेपेक्षा महाराजांना परिस्थिती अधिक अनुकूल होती. 1896 सालीच पुरोहितवर्गाचा 'उद्धटपणा' व 'प्रस्थापित हितसंबंध' यांच्याविरुद्ध धार्मिक विधिविधानांच्या क्षेत्रात, दोन हात करण्याचे धैर्य त्यांनी दाखवले होते. राज्यात 'वेदोक्त' व 'पुराणोक्त' असा वाद माजला होता. महाराजांनी ज्ञानाची कास धरली. सांगोपांग विचार करुन त्यांनी 'वेदोक्तास' पाठिंबा दिला. कोणत्याही जातीचा वा वर्गाचा पुरोहित असो, त्याला आपल्या विधिविधानांची चांगली माहिती आणि उत्तम समज असली पाहिजे, यासाठी त्यांनी 1915 साली एक पुरोहित कायदा केला. परवाना धारक पुरोहितांकडून धार्मिक विधिविधाने करुन घेण्याची काही अंशी तरतूद करणारा हा कायदा होता. 1927-28 साली काही निवडक प्रदेशापुरता तो लागू करण्यात आला व 1934-35 सालाच्या दरम्यान सर्व संस्थानात तो अमलात आला. 1901-02 सालचा विधवा विवाहाचा

व धर्म स्वातंत्र्याचा कायदा, 1904-05 सालचा बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि 1908 सालचा विवाह नोंदणी कायदा यामागे महाराजांचीच प्रेरणा होती. घटस्फोटास कायद्याने मान्यता देण्याचा साहसी आद्य प्रयत्न बडोदे संस्थानात घडला. अज्ञान, पूर्वग्रह आणि अंधश्रद्धा यांच्या दडपणाखाली प्रजाजन मुक्त नव्हते, तेव्हा अत्यंज आणि अस्पृश्य यांच्या प्रश्नाबाबत मात्र महाराजांनी सावधगिरीने पावले टाकली. महाराजांनी अंत्यजांसाठी वसतिगृहाची सोय असणाऱ्या शाळा सुरू केल्या. बडोद्यात एक आर्यकुमाराश्रम सुरु करण्यात आला. अंत्यज मुलाला आर्यकुमार किंवा आर्यपुत्र म्हणणे प्रतिष्ठा प्राप्त करुन देणारे होते. 23 मार्च 1918 रोजी भरलेल्या अस्पृश्यता निवारण परिषदेचे महाराज अध्यक्ष झाले. तेव्हा त्यांनी जपान वा रशिया या देशांचे अनुकरण करून सामाजिक गुलामगिरीचा त्याग करण्यासाठी कळकळीचे आव्हान केले होते. तसे केल्यासच आपल्या राष्ट्राला जगात सन्मानाचे स्थान प्राप्त होईल असे ठामपणे व्यक्त केले.

सर टी. माधवरावांच्या काळात ग्रंथालयाचे काम सुरू झाले होते. महाराजांना सुद्धा हे काम महत्वाचे वाटले. त्यामुळे त्यांनी हे काम खूप पुढे नेले. पण त्यात त्यांना समाधान नव्हते. ग्रंथालय चळवळीचा विस्तार अधिक विस्तृत स्तरावर व्हावा असे त्यांना वाटे. यामुळे इतर अनेक उपक्रमांप्रमाणे ग्रंथालय चळवळीच्या आद्यत्त्वाचा मान बडोद्याकडे जातो. प्रत्यक्ष ग्रंथालयविभाग 1910 साली सुरु झाला असला तरी त्या संबंधाने महाराजांच्या मनात त्याविषयी बराच विचार चालू होता. एकदा त्यांनी आपल्या भाषणात म्हटले आहे, ''लोकांना आधी शिक्षण तर द्यायचे व नंतर मात्र त्या दृष्टीने कसलीच साधने उपलब्ध करुन द्यायची नाहीत, हा घोर अपराध नसला, तरी ही उघड उघड विसंगत गोष्ट आहे.'' 1907-08 साली महाराजांनी अमेरिकेला भेट दिली तेव्हा या ग्रंथालय चळवळीला मूर्तस्वरूप प्राप्त झाले. ग्रंथालय संचालकपदी डॉ. डब्ल्यू. ए. बॉर्डेन या अमेरिकन तज्ज्ञाची त्यांनी 1913 साली नेमणूक केली. तसेच राज्यातील ग्रंथालय चळवळीचे जनक ठरलेले मोतीभाई अमीन यांना महाराजांनी बॉर्डेनचे मार्गदर्शन मिळवून दिले. अशा रीतीने महाराजांनी ग्रंथालय चळवळीच्या दृष्टीने अगदी महत्त्वाचे कार्य केले. राजवाड्यातील स्वतःचे खाजगी संग्रहसुद्धा जनतेस अर्पण केले. मध्यवर्ती ग्रंथालयांचे ते सुरुवातीचे केन्द्रस्थान ठरले. महाराजांचे बंधू संपतराव यांनी आपला समृद्ध संग्रहसुद्धा या ग्रंथालयाला दिला. ग्रंथालय खात्याने एक चांगला बालविभागही जोडला

आणि फिरत्या ग्रंथालयाची योजनाही सुरू केली. डॉ. बॉर्डेन तीन वर्षे बडोद्यात होते. या काळात त्यांनी अनुदानयुक्त आणि मुक्त ग्रंथालयांची तसेच वाचनालयांची पद्धत सुरू केली. वय, जात, धर्म, लिंग.... कोणताही भेदभाव न राखता या संस्था सर्वांसाठी खुल्या होत्या.

ज्ञान-संवर्धनाचा पुढील टप्पा गाठण्यासाठी आंतरराष्ट्रीय कीर्तीची प्राच्यविद्या संशोधन संस्था स्थापन करण्यात आली. तेथे संस्कृतातील व अन्य अभिजात भारतीय भाषांतील ग्रंथाचा संग्रह करण्यात आला. विद्वानांनी त्याला अभ्यासार्थ अवश्य ते साहाय्य देऊन कार्याचा श्रीगणेशा केला. या कार्याचा पाया विठ्ठलमंदिरातील दुर्मिळ संग्रह हस्तगत करून घालण्यात आला. संपतरावांकडून व अन्य ठिकाणाहून प्राप्त केलेल्या शेकडो ग्रंथांची त्यात भर पडत होती. मध्यवर्ती ग्रंथालयाची एक शाखा म्हणून हे कार्य सुरू झाले होते. पण 1927 मध्ये 'ओरिएंट इन्स्टिट्यूट' (प्राच्यविद्यामंदिर) असे नामकरण करुन महाराजांनी त्यास स्वतंत्र ओळख निर्माण करून दिली. या संस्थेने 14,000 हस्तलिखिते व 12,000 हून अधिक दुर्मिळ ग्रंथ जमवून विक्रम स्थापन केला. संस्थेने 'गायकवाड ओरिएंटल सीरिज' या मालेमधून अप्रसिद्ध व दुर्मिळ असे संस्कृत, प्राकृत व अर्धमागधी ग्रंथ प्रसिद्ध केले. या संस्थेच्या भाषांतर विभागाने 'सयाजी ज्ञानमंजुषा' आणि 'लघु-ज्ञानमंजुषा' या साहित्यमालांद्वारे मूळ संहितांसह अनेक भाषांतरे प्रकाशित केली. आयुष्याच्या अखेरच्या वर्षी सयाजीरावांनी 'फॉरेन व्होकॅब्युलरी ऑफ दि कुराण' (कुराणातील परकीय शब्दसंग्रह) हा प्रो. ऑर्थर जेफ्री यांनी साक्षेपाने तयार केलेला ग्रंथ प्रसिद्ध करण्याची व्यवस्था केलेली होती.

1919 च्या जानेवारी महिन्यात राज्यात बालवीर चळवळीचा प्रारंभ झाला व पुढे ती सर्व राज्यात पसरली. 'हिज हायनेस दि महाराजाज बॉय स्काउट्स' मध्ये रिमांड होमच्या मुलांचाही समावेश होता. या चळवळीस विशेष प्रतिसाद मिळाला नाही, तरी महाराज खचले नाहीत. 1929 साली इंग्लंडात भरलेल्या बालवीर मेळाव्याला बडोद्यातील बालवीरांची एक तुकडी मुद्दाम पाठविली होती. या प्रवृत्तीस प्रोत्साहन मिळावे म्हणून त्या मेळाव्यास ते जातीने हजर राहिले.

महाराजांच्या कारकिर्दीस 27 मे 1925 रोजी, पन्नास वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने त्यांनी भव्य सोहळा आयोजित केला. आणि एक सुवर्णजयंती व्याख्यानमाला सुरू केली. त्यात आंतरराष्ट्रीय कीर्ती

संपादन केलेल्या मान्यवर विद्वानांना आदराने बोलावण्यात आले. संस्थानातील महत्त्वाच्या शहरास दूरध्वनीची सोय उपलब्ध करून देण्यात आली. तुरुंगातील कैद्यांना मुक्ती व शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सुट ही या कार्यक्रमाची वैशिष्टये होती. या निमित्ताने त्यांनी एका देखण्या इमारतीच्या निर्मितीचा संकल्प सोडला. तिचे मूर्त स्वरुप म्हणजे 'कीर्तिमंदीर' हे होय.

1927 पासून 1939 पर्यंतच्या काळात सयाजीरावांनी आपल्या संपन्न व प्रदीर्घ राजवटीच्या अखेरच्या टप्प्यात प्रवेश केला. परंतु त्यांना एका अभूतपूर्व आपत्तीस तोंड द्यावे लागले. या टप्प्याचा प्रारंभ विश्वामित्री नदीच्या अत्यंत भीषण पुराने झाला. यापूर्वी लोकांनी अशी आपत्ती कधी पाहिली अथवा ऐकलीही नव्हती, असे उद्‌गार तत्कालिन लोकांकडून निघाले. महाराज तेव्हा युरोपात होते. पूरग्रस्तांना शक्य ती मदत करा असा आदेश दिला. महाराजांचे पुत्र धैर्यशीलराव त्या प्रसंगी खंबीरपणे पुढे आले. पूरग्रस्त विभागास त्यांनी त्वरित भेट दिली आणि अत्यंत बहुमोल सेवा केली. बडोदे शहराचे या पुराने अतोनात नुकसान झाले. पण बडोद्याच्या प्राणिसंग्रहालयातील जवळ जवळ सर्वच प्राणी या पुराचे बळी ठरले.

महाराजांच्या राजवटीचा अंतिम टप्पा भक्कम पायावरील दृढीकरण आणि सुधारणांची वाढ या दृष्टींनी विशेष उल्लेखनीय होता. 1927 साली सर मनुभाई मेहता यांच्या जागी आलेले दिवाण सर व्ही. टी. कृष्णमाचारी यांनी रस्ते सुधारण्याचा कार्यक्रम नेटाने हाती घेतला. पूरग्रस्त विभागातील रस्तेदुरुस्तीचे काम ही त्यांची उल्लेखनीय कामगिरी होय. याच काळात रेल्वेस्थानकांना जोडणाऱ्या उपक्रमांना महत्त्व प्राप्त झाले. कारकिर्दीच्या शेवटच्या वर्षात 1938-39 मध्ये एकशे चौदा रस्ते तयार झाले. त्यांची लांबी 289 मैल होती. 1931-32 मध्ये सरकारी साहाय्याने 272 विहीरी बांधल्या गेल्या व 277 कूपनलिकाही खोदण्यात आल्या.

महाराजांना शेतकी व्यवसायात सुधारणा करण्याचा नेहमी उत्साह असे. या कामासाठी दरवर्षी शासन साडेसात लाख रुपये खर्च करत असे. त्यामुळे शेतकी व्यवसायात प्रगती झाली होती. पण शेतात गुरे घुसून, पिकांची नासाडी करत असत, म्हणून महाराजांनी गुरे मोकाट सोडणाऱ्यांना शिक्षा करणारा कायदा केला.

मलेरियाविरोधी मोहीम हाती घेऊन प्रत्येक खेड्यासाठी पाच मैलांच्या परिसरात एकेक वैद्यकीय केन्द्र स्थापन करण्यात आले. 1938-39 साली शासकीय सहाय्याने चालणारी अशी एकूण 110 केन्द्रे होती. राज्यात ग्राम आरोग्य केन्द्रे आणि आठ रुग्णालये कार्यरत झाली होती. गरीब मुसलमानांना कारखान्यांतील ग्यार मी (सत्रातील शिजविलेले अन्न) देण्याची व हिंदूंना खिचडी वाटण्याची जुनी चालत आलेली प्रथा 1936-37 साली महाराजांनी बंद केली. त्याऐवजी अशा मंडळींना दरमहा ठराविक वृत्तिवेतन देण्यात येऊ लागले. 1935-36 मध्ये पुरातत्व सर्वेक्षण खाते सुरू करण्यात आले व त्याच्या पुढल्या वर्षीच सांख्यिकी खातेही सुरु झाले. 1937-38 साली बडोद्याजवळ हरणी खेड्यात एक विमान तळ उभारण्यात आले. 1936-37 साली माध्यमिक शिक्षकांसाठी प्रशिक्षण महाविद्यालय निघाले. तसेच जिल्हा पातळीवर शाखा असणारे एक राज्य-आर्थिक मंडळ स्थापन झाले.

1935च्या मे महिन्यात सयाजीरावांच्या राजवटीची साठ वर्षे पूर्ण झाली. ह्या निमित्ताने एक हिरकमहोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. ह्यासाठी महाराजांनी आपल्या नेहमीच्याच उत्साहाने या संधीचा उपयोग करून एक कोटीचा हिरकमहोत्सव विश्वस्तनिधी निर्माण केला. ह्या निधीचा उपयोग खेड्यापाड्यांतील जनतेची, विशेष म्हणजे पददलित व दीनदुबळ्या प्रजेची स्थिती सुधारण्यासाठी व्हायचा होता. या शेवटच्या टप्प्यात बडोद्यात एक विद्यापीठ आणि एक आकाशवाणी केन्द्र स्थापन करण्याचा विचार आला व त्यासाठी पुष्कळसे प्राथमिक कार्यही या टप्प्यात पूर्ण झाले. पण या योजना साकार होण्यापूर्वीच 6 फेब्रुवारी 1939 रोजी सर सयाजीराव गायकवाडांचे निधन झाले.

## ई) सयाजीरावांच्या वैयक्तिक जीवनातील ठळक घडामोडी

27 मे 1875 रोजी सयाजीरावांचे दत्तकविधान होऊन ते राजपदी बसले. पण ''शिरावर राजमुकुट धारण करणारे मस्तक सदैव अस्वस्थच असते'' असे शेक्सपियरने म्हटले आहे. हे अतिशय समर्पक आणि यथार्थ वाटते. दिवसाचे चोवीस तास त्यांना महाराज म्हणून वावरावे लागे, अशा यातना त्यांना प्रारंभीच अनुभवायला मिळू लागल्या.

महाराजांचे व्यक्तिमत्त्व सहज आकलन होण्यासारखे सरळ किंवा एकमार्गी नसल्याचा सतत प्रयत्न येतो. कारण महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात अनेक पदर आहेत. त्यात कमालीची गुंतागुंत जाणवेत. प्रजेचा पालक, आणि पिता बनण्याची आकांक्षा मनात असणाऱ्या महाराजांचे व्यक्तिमत्त्व, गुंतागुंतीचे, परस्परविरोधी गुंणानी युक्त असे व्यामिश्र आहे. आपल्या मनात काय चालले आहे याचा थांगपत्ता ते इतरांना लागू देत नसत. त्यांचा स्वभाव अंतर्मुख असल्यामुळे किंवा ते भिडस्त होते व म्हणूनच कोणाजवळही आपले मन मोकळे करण्याची त्यांची वृत्ती नव्हती. घरात, आपल्या संस्थानात व देशात ते महाराजा होते.

सार्वभौम ब्रिटिश सत्तेचे मांडलिक असणे त्यांना आवडत नसे. व्हाईसरॉय किंवा रेसिडेंटसारखे ब्रिटिश अधिकारी आपला हक्क गाजवू लागले की त्यांच्या तळपायाची आग मस्तकात जात असे. ज्यांच्याशी मैत्रीचा तह झालेला आहे, त्या ब्रिटिश सम्राटाचा प्रतिनिधी या नात्याने व्हाईसरॉय किंवा बडोद्याचा रेसिडेंट हे उत्तम परराष्ट्रीय वकीलाप्रमाणे ब्रिटिश सम्राट किंवा देशी संस्थानिक यांचे हितसंबंध समानतेच्या पातळीवर सांभाळीत नसत, ह्याचे त्यांना वैषम्य वाटे.

राजाने प्रजेच्या समस्या सोडवायच्या असतात. स्वत:च्या समस्यांची रडगाणी गाऊन प्रजेजवळ दयेची भीक मागायची नसते असे त्यांचे प्रांजळ मत होते. आपल्या प्रत्येक मताशी प्रामाणिक राहणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळे ते आपल्या भावना लपवण्याचा जागरुकतेने प्रयत्न करीत. अगदी निकटच्या व्यक्तिसही ते आपल्या मनाचा थांगपत्ता लागू देत नसत. तरीही त्यांच्या मानसिक यातनांची माहिती रियासतकारांच्या लिखाणात बघावयास मिळते. त्यांच्या जागरुकतेच्या संदर्भात रियासतकार लिहितात...
''भोवतालच्या लोकांबद्दल त्यांच्या मनात आकस वा संशय होता, असे नव्हे. पण राजगादीवर आरूढ होताच, त्यांचे मन आपसूक राजाचे झाले असावे. व्यथा आणि अस्वस्थ मानस दडवण्यासाठी ते टोकाची खबरदारी घेत. भूतकाळाचे दोर तोडण्याचे वचन घेऊन दत्तक विधानाचा कार्यक्रम संपन्न झाला होता. नंतर प्रशिक्षणाच्या भरगच्च कार्यक्रमात मैत्रीसंबंध स्थापन करण्यास संधी वा सवड नव्हती. पुढे, तो त्यांचा अंगभूत स्वभावधर्म बनला. प्रजापालन हे राजाचे श्रेष्ठ कर्तव्य! ते पार पाडत असताना राजास अग्निपरिक्षेस सामोरे जावे लागले तरी प्रजेस त्याचा वासही येणे अयोग्य आहे, असे त्यांना वाटे. कौटुंबिक जीवनात सुद्धा

ते कुणास मनाचा तळ गाठू देत नसत. ते आपल्याला परके समजतात, अशी त्यांच्या स्वकियांची सदैव तक्रार असे.'' [19] पहिल्या पत्नीवर महाराजांचा जीव होता, असे दिसते. या दांपत्याला जुलै 1881मध्ये एक व जून 1882 मध्ये दुसरी अशा दोन मुली झाल्या, पण त्या अल्पवयीन ठरल्या. 3 ऑगस्ट 1883 रोजी राजदांपत्याला पुत्ररत्नाचा लाभ झाला. त्यांचे नामकरण फत्तेसिंहराव असे करण्यात आले. पत्नीच्या मृत्यूनंतर तयार झालेल्या राजवाड्यास त्यांनी **'लक्ष्मीविलास पॅलेस'** नाव दिले.

त्यांची दिनचर्या निश्चित झालेली होती. नियमितपणा आणि नेमस्तपणा हे त्यांचे स्वभाव विशेष होते. सूर्योदयाबरोबर ते उठत, मग प्रातर्विधी आटोपून ते व्यायाम करत. नंतर स्नान करुन ते हलकी न्याहारी घेत. नंतर पायी वा घोड्यावरुन रपेट करीत. अकरा वाजता भोजनाची वेळ होईपर्यंत ते कामकाज पाहात. नंतर थोडा वेळ विश्रांती घेऊन किंवा एखादा बिलियर्डचा डाव खेळून चहापानाच्या वेळेपर्यंत म्हणजे दुपारी साडेतीन किंवा चार पर्यंत ते सरकारी कचेरीतील कामे पाहात. त्यानंतर सवडीनुसार आपल्या कुटुंबियांसोबत ते काही काळ घालवीत किंवा लोकांच्या गाठीभेटी घेत. संध्याकाळी साडेपाच किंवा सहापासून सुमारे दोन तास ते फिरायला जात किंवा घोड्यावरुन फेरफटका मारीत परत येताना काही वेळ नातेवाईकांना वा आश्रितांना भेटून त्यांची विचारपूस करीत. मग रात्रीच्या भोजनासाठी ते राजवाड्याकडे परतत. रात्रीचे भोजन झाले की नऊ ते अकरा या काळात त्यांचे वाचन दैनंदिनीलेखन वगैरे चाले.

त्यांचे घोडेस्वारीवर फार प्रेम होते. बडोदे शहरापासून अठरा मैल अंतरावर असलेल्या डबका या गावी ते अधूनमधून शिकारीसाठी जात. परत येऊन पुन्हा सायंकाळी न थकता घोडेदौड करण्यास चुकत नसत. काम आणि व्यायाम हे त्यांचे जीवनाचे सूत्रच बनले होते. सयाजीविहार क्लबमध्ये संध्याकाळी टेनिस खेळणे हा त्यांच्या आवडीचा भाग होता. स्वतःच्या मुलांनीही टेनिस व क्रिकेट सारखे खेळ खेळावे, म्हणून त्यांनी प्रोत्साहन दिले व त्यासाठी शिक्षकही नेमले. बडोद्यातील हा दिनक्रम त्यांनी अखेरपर्यंत निष्ठेने पाळलेला होता.

28 मे 1885 रोजी महाराजांच्या दुसरा विवाह झाला. आपल्या नववधूचे नामकरण 'दुसऱ्या' चिमणाबाई असे झाले. पहिल्या पत्नीच्या मृत्युमूळे सयाजीरावांना अनेक दिवस झोपही येत नसे व त्यांच्या

प्रकृतीवर फार अनिष्ट परिणाम झाला. दुसऱ्या विवाहामुळे सुद्धा त्यांचा निद्रानाश काही कमी झाला नाही ही व्यथा कायमच राहिली. दुसऱ्या विवाहानंतर त्यांना जयसिंहराव, शिवाजीराव, इंदिराराजे व धाकटे धैर्यशीलराव ही अपत्ये झाली. त्यांचे मुलांवर अपार प्रेम होते. पण ते प्रेमाचे प्रदर्शन टाळत किंवा प्रेम व्यक्त करणे त्यांना जमत नसे. मुलांनी लगट करू नये, आदब पाळावी अशी त्यांची अपेक्षा असे. फक्त परिवारातील मंडळीची उपस्थिती असेल तेव्हाही त्यांचा हा आग्रह असे. त्यामुळे आपल्या राजेपणाचा त्यांना विसर पडत नाही अशी त्यांच्या कुटुंबियांची तक्रार असे. ते मुले आणि पत्नी यांच्यावर टोकाची शिस्त लादत. मुलांनी ती जाचक वाटे. प्रत्येक क्षणी पिता नव्हे तर राज्यकर्त्यास सामोरे जाणे मुलांना पसंद नसे. परंतु इंदिरा राजे वेळ प्रसंगी वादविरोधाचे धाडस करीत. युरोपमध्ये दिसणारा स्त्रीमतांचा आदर त्यांना योग्य वाटे. म्हणूनच महाराणी गोषाचा आग्रह धरत असूनही त्यांनी इंदिरा राजे यांना बडोदा कॉलेजात शिकण्याची संधी दिली.

महाराजांचे प्रवासप्रेम हे जगजाहीर होते. सप्टेंबर 1886 मध्ये हवापालट म्हणून राज्यस्थानातील थंड हवेचे ठिकाण अबू येथे काही आठवडे महाराजांनी मुक्काम केला. त्यांनंतर त्यांनी सिलोनला भेट दिली व परत येताना फेब्रुवारी 1887 मध्ये ते महाबळेश्वरला राहिले. त्यांना धड झोप येत नसल्याने त्यांची अशक्ती तशी कायम होती. डॉक्टरांनी मज्जाक्षीणतेचा विकार जडल्याचे निदान केले आणि महाराजांना युरोपला हवा पालटण्यासाठी जाण्याची सूचना केली. युरोपचे हे दौरे त्यांनी सत्कारणी लावले. पश्चिमेतील नव्या सुधारणांशी, तसेच नवनवे लोक, नवनव्या चालीरीती आणि जीवनक्रम यांच्या संपर्कात आल्याने संस्थानच्या एक प्रकारे फायदाच झाला.

आपल्या त्रेसष्ट वर्षाच्या कारकीर्दित महाराजांनी चोवीस वेळा (ईजिप्त भेटीसह) युरोपचा प्रवास केला. आणि जवळजवळ बावीस वर्षे म्हणजे आपल्या कारकीर्दीचा तिसरा हिस्सा त्यांनी भारताबाहेर म्हणजे युरोप, अमेरिकेत घालविला. यामध्ये हवा पालटासाठी किंवा सरकारी भेटींच्या निमित्ताने बडोद्याबाहेर पण भारतातच त्यांनी केलेल्या सुमारे आठ वर्षाचा काळ मिळविल्यास एकूण तीस वर्ष ते आपल्या राज्याबाहेर राहिले. त्यांच्या राजवटीचा हा जवळ जवळ अर्धा हिस्सा ठरतो. 'गैरहजर राजा' असा त्यांच्यावर थट्टेखोर पणे शिक्का मारला जाई तो ह्यामुळेच.

महाराजांनी लिहिलेली पत्रे आणि दैनंदिनी यातून विविध स्थळांना भेट देण्याची देण्याची त्यांची हौस, चौकस निरीक्षण शक्ती आणि अपार जिज्ञासू वृत्ती यांचे दर्शन घडते. आरंभी प्रकृतीची नादुरुस्ती, विश्रांती वा हवापालट हा त्यांचा परदेश सफरींमागचा मुख्य उद्देश होता. नंतर पुढे पुढे त्यांना प्रवासाचा छंदच लागला. बडोदे संस्थानाच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनावर याचा चांगलाच परिणाम झाला. तिसऱ्या सफरीवर असताना त्यांना आपल्या राज्यात सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरु करण्याची प्रेरणा मिळाली. स्त्रियांनी उद्योगधंदा करावा. योग्य काळजी घेऊन स्त्रियांना कलांचे प्रशिक्षण देणे योग्य आहे, हे त्यांना युरोपात फिरतानाच पटले. परिणामी, बडोद्याला चिमणाबाई स्त्री उद्योगालय स्थापन झाले. त्यांच्या अमेरिकेच्या सफरीनंतरच मध्यवर्ती ग्रंथालय स्थापनेची कल्पना साकार झाली. जिनीव्हा येथील म्युझियम आणि चित्रसज्जा पाहूनच त्यांनी बडोद्यातील म्युझियम व चित्रसज्जेची स्थापना केली. झूरिच मध्ये त्यांनी 'स्कूल ऑफ आर्ट' पाहिले आणि मग बडोद्यात कलाभवन स्थापन झाले. युरोपची स्वच्छता, व्यवस्थित रचना, तेथील समाजसेवेची आवड आणि 'उद्यमी वृत्ती' या सर्वच गोष्टींनी त्यांच्या मनावर छाप पाडली. त्यातील जमेल तेवढा ग्राहयांश आपल्या राज्यामध्ये बाणविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. लक्ष्मीविलास पॅलेसमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे पांढरे शुभ्र गणवेष, मर्यादाशील वर्तन आणि काटेकोरपणा यातही पश्चिमेचा प्रभाव जाणवत असे. बडोद्यातील सयाजीविहार क्लब व हिंदविजय जिमखाना यांची निर्मितीही ह्याचीच प्रेरणा आहेत.

महाराजांच्या व्यापक दृष्टिकोन त्यांच्या प्रशासनात आणि नेमलेल्या अधिकाऱ्यांतही दिसून येतो. अनेक अधिकाऱ्यांना कामाच्या निमित्ताने किंवा प्रशिक्षणासाठी त्यांनी युरोप किंवा अमेरिका या देशात पाठवले होते. यामुळे कोणीही परदेशी मंडळी इकडे आली की त्यांना हौशीने आपले संस्थान दाखवित. म्हणून कित्येक मान्यवरांना युरोपच्या स्थळांची माहिती असे तशी बडोदे, नवसारी, पेटलाद वगैरे स्थळेही माहित असत.

प्रगतीपथावर वेगाने वाटचाल करीत असताना अनेक अडचणी येत राहिल्या. कधी निसर्गाचा कोप बनून तर सार्वभौम सत्तेची मर्जी न राखल्यामुळे अथवा कौटुंबिक शोकांतिका यांच्या स्वरूपात. इ.स.14 जून 1897 रोजी ताराबाई व लगेच 29 नॉव्हेंबर 1898 रोजी मातोश्री जमनाबाई निधन पावल्या. या आपत्तींचा

महाराजांनी धीरोदात्तपणे सामना केला. चिकाटी, आत्मविश्वास आणि कर्तव्यतत्परता हे त्यांच्या मधिल प्रमुख गुण होते.

महाराज प्रदीर्घ काळपर्यंत वारंवार संस्थानात अनुपस्थित असल्याने कारभारात रेसिडेंटचे प्रस्थ विशेष वाढलेले होते. त्यांच्या युरोपसफरींवर टीका होऊ लागली. महाराजांवर त्यांचा उघड असा काही परिणाम दिसेना म्हणून सरकारने 'महाराज बडोद्यास नसले की काम खोळंबू नये' यासाठी कार्यकारी मंडळ नेमण्याचा निर्णय घेतला.या सल्लागार मंडळाच्या बैठकीतही रेसडेंटचा शब्द निर्णायक बनू लागला. महाराजांना ही गोष्ट मान्य नव्हती. परंतु त्यांचा नाईलाज होता. 1888 मध्ये एलियटला राजकीय अधिकारी या नात्याने युरोपला आपल्याबरोबर दुसऱ्यांदा नेण्याची महाराजांची इच्छा होती, पण त्यांना तशी परवानगी मिळाली नाही. 1892 साली कर्नल रेनॉल्डस् (रेसिंडेट) याने, महाराज ज्या लोकांना स्वत: बरोबर नेणार होते, त्यांची माहिती मागितली आणि त्यांनी आपल्या परिवारात हिंदुस्थान सरकारच्या अधिकाऱ्याचा समावेश करावा असा सल्ला दिला. हिंदुस्थान सरकारच्या सूचनेचे स्वरूप गंभीर होते. ती सूचना म्हणजे युरोप सफरीवर असताना सयाजीरावांनी बडोद्याचे महाराज असता कामा नये. आपल्या परिवारात एक राजकीय अधिकाऱ्याचा समावेश करण्याची रेसिंडेटची सूचना महाराजांना अंमलात आणावी लागली. आणि त्या अधिकाऱ्याचा खर्चही त्यांना करावा लागला. प्रत्यक्ष महाराजांपेक्षा आपण कोणीतरी वरिष्ठ आहोत, असा आव हे अधिकारी आणीत म्हणून महाराजांचे पित्त खवळत असे. अपरिहार्य आपत्ती समजून सरकारच्या या अपमानास्पद योजनेस त्यांना होकार द्यावा लागला.

''प्रशासनात मला मदत करण्यासाठी मी सरकारकडे ऑफिसरांची मागणी केली होती. म्हणून नवे अधिकारी बडोद्यास आले आहेत''असे म्हणून स्वत:च्या अधिकाराचा वरकरणी देखावा महाराजांना करावा लागत असे. ''बऱ्याच कालावधीनंतर या राज्य व्यवस्थेचा परिणाम म्हणून महाराजांच्या अधिकाराला गौणत्व प्राप्त झाले, आणि त्यांच्या प्रतिष्ठेलाही हानी पोचली. महाराजांनी आपल्या युरोप सफरींना वेळीच आळा घातला असता तर हा प्रसंग ओढावला नसता. आपले थोडे चुकले असे त्यांना वाटल्याचे त्यांच्या काही पत्रांवरून कळते.'' [20]

आपल्याला त्रास देण्यास रेसिडेन्सीतील बरीच मंडळी उत्सुक आहेत हे महाराज जाणून होते. पूर्वी एकदा बडोद्याचे रेसिडेंट असणाऱ्या सर जॉन वॉटसन यांनी महाराजांना लिहिले होते, ''देशी संस्थानिकांनी लक्ष देण्याच्या दृष्टीने एकूणच गोंधळात टाकणाऱ्या प्रश्नांची जटिलता वर्षावर्षाला वाढत चालली आहे. अडचणी आणि बंधने यांच्या कात्रीत सांपडल्याने संस्थानिकाला स्वाभिमान आणि पूर्वजांकडून प्राप्त झालेली प्रतिष्ठा यांना मुकावे लागत आहे'' याच पत्रात त्यांनी अशी अपेक्षा प्रकट केली होती की सार्वभौम सरकारने 'रेसिडेन्सीकडून काळजीपूर्वक संपादित होऊन सादर करण्यात येणाऱ्या वृतांतावर च केवळ अवलंबून राहू नये, कारण देशी संस्थानांच्या कारभारातील वरवरच्या दोषांचा फायदा घेण्यासाठी रेसिडेन्सी नेहमीच टपलेली असते.' [21]

लॉर्ड कर्झनच्या कुप्रसिद्ध 'कर्झन सर्क्युलर' ने त्यांच्या उद्वेगात भर घातली. आपल्या दोन सहृदय मित्रांना दादाभाई नवरोजी आणि बहेरामजी मलबारी यांना लिहिलेल्या पत्रात महाराजांनी आपल्या मनस्थिती:स वाचा फोडली. ''राज्याचे अधिपती म्हणवणाऱ्या आम्हाला वास्तवात पगारी नोकरांपेक्षाही हीन रीतीने वागवले जाते.''

कर्झनच्या परिपत्रकाचा विरोध करण्यात अर्थ नाही, असे दिवाणांचे मत होते. या परिपत्रकात हिंदी संस्थानिकांनी परदेशी जाण्यापूर्वी सरकारची परवानगी घेतली पाहिजे, हा निर्बंध या पत्रकाद्वारे जारी करण्यात आला. आपल्या ग्वाल्हेरच्या भाषणात व्हाइसरॉय यांनी या विषयाचें सूतोवाच केले होते. सदर भाषणात व्हाईसरॉय यांनी म्हटले होते की संस्थानिकांनी 'आपल्या हाती असलेल्या सत्तेचा आपण रास्तपणे उपयोग करतो, हे दाखवून दिले पाहिजे. त्यांनी या सत्तेचा गैरवापर करता कामा नये'. तसेच त्यांची उपस्थिती केवळ पोलोच्या मैदानावर, रेसकोर्सवर किंवा युरोपीय उपहारगृहातूनच दिसून चालणार नाही. त्यांचे खरेखुरे कर्तव्य त्यांनी आपल्या प्रजाजनांमध्ये राहण्यात असते, हेही निदर्शनास आणले.

कर्झन आणि सयाजीराव यांच्यासारख्या जबरदस्त मनोबळाच्या दोन व्यक्तींत खटले उडणे अपेक्षितच होतें. आणि तो बेबनाव परिपत्रकापुरता मर्यादितही राहिला नाही. लॉर्ड किचनेर यांच्याशीही कर्झनचे खटके उडत होते. 1903 साली कर्झनची सयाजीरावांशी पुन्हा एक झटापट झाली. प्रिन्स ऑफ

वेल्सच्या ब्रिटिश साम्राज्याच्या युवराजाच्या स्वागतासाठी दरबार 1903 सालच्या 1 जानेवारीस दिल्लीस भरणार होता. त्यासाठी व्हाईसरॉयने हत्तीची मिरवणूक, शेंदरी रंगाच्या सरंजाम तसेच समारंभाच्या केन्द्रस्थानी व्हाइसरॉय राहणार, अशी योजना आखली. सर्व संस्थानिकांनी त्यात सामील व्हायचे होते. संस्थानिकांचे मत ह्यावेळी विचारण्यात आले होते. रेसिडेंटला त्यांचे मत आवडले नाही. सयाजीरावांनी त्याला हरकत घेतली. हत्तींची मिरवणूक, शेंदरी रंगाच्या सरंजाम तसेच समारंभाच्या केन्द्रवर्ती व्हाईसरॉय राहणार, हे या मतभेदाचे प्रमुख मुद्दे होते. अशा गोष्टीमुळे हिंदुस्थान सरकारची किंवा ॲंग्लो-इंडियन समाजाची आपल्यावर कृपादृष्टी होते, असल्या युक्तिवादाची आपल्यावर सक्ती होणे, हेही महाराजांना आवडले नाही. व्हाइसरॉयशी मदभेद म्हणजे ब्रिटिश किंगचा अवमान हे समीकरण त्यांना साफ नामंजूर होते.

ब्रिटिश साम्राज्याच्या सन्मानापेक्षा लॉर्ड कर्झनचा सन्मान वाढावा यासाठी या दरबाराची योजना आहे, असे सर्व धुरंधरांना कळत होते. महाराजांनी ''राज्यरोहणाच्या निमित्ताने आपले हार्दिक व निष्ठापूर्वक अभिनंदन आणि नववर्षाच्या शुभेच्छा बादशहांकडे प्रविष्ट'' कराव्यात अशी विनंती व्हॉईसरॉयला केली.

नंतरच्या वर्षी 'इम्पिरियल सर्व्हिस ट्रूप'च्या प्रश्नावर व्हाइसरॉयबरोबर सयाजीरावांची चकमक उडाली. सन् 1904 च्या एप्रिल महिन्यात, या संबंधात व्हाइसरॉयचे पत्र संस्थानात आले. त्यावर सयाजीरावांनी जे एक मुद्देसूद निवेदन सादर केले होते, चार वर्षांपूर्वी म्हणजे 1889 मध्ये रशियाच्या धास्तीमुळे संस्थानिकांनी उत्स्फूर्तपणे आणि व्यक्तिगत नात्याने केलेल्या प्रस्तावात 'इंपीरियल सर्व्हिस' चे मूळ आहे. केवळ हिंदी प्रदेशाचे नव्हे तर साम्राच्याच्या सर्व परदेशी हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी, ब्रिटिश सरकारला द्रव्य आणि सैन्य पुरवण्याची जबाबदारी एतद्देशीय संस्थानिकांनी मान्य करावी अशी अपेक्षा ठेवण्यात येत आहे. पण बदल्यात संस्थानिकांना काय मिळेल याचा सरकार काहीच उल्लेख करत नाही. जबाबदारी स्वीकारणाऱ्या संस्थानिकांना साम्राज्यांतर्गत जबाबदारीस अनुरुप हक्क आणि मान्यताप्राप्त अधिकार देण्याच्या संदर्भात सरकार कसलीही तयारी दर्शवू इच्छित नसेल तर ही अपेक्षा रास्त कशी ठरेल? द्रव्य व सैन्य देणाऱ्या संस्थानिकांना दैन्य व उपेक्षा देणारा सरकारचा हा पवित्रा अजब आणि अन्यायकारक आहे.

सयाजीराव जाहीरपणे स्वामीनिष्ठा व्यक्त करीत असले तरी त्यांच्या मनात काही किंतू आहे असे ब्रिटिश सरकारला वाटत असे. नोकरशाही सदैव त्यांचा पाणउतारा करण्यास उत्सुक असे. लवकरच 1911 साली अशी संधी त्यांना प्राप्त झाली.

महाराज सातत्याने मानसिक तणाव आणि संघर्ष यांना सामोरे जात होते. आपल्या युरोप सफरीचा कार्यक्रम आगाऊ सादर करण्याच्या मागणीमुळे ते नाराज होते. महाराजांबरोबर राजपरिवार असणार होता. त्यात अर्थातच स्त्रियांचा समावेश होता. नोकरशाही गुलामांनी राजस्त्रियांची असभ्य चौकशी आरंभली. महाराजांना ते पटण्यासारखे नव्हते. नोकरशाही किंवा वृत्तपत्रकार महाराजांच्या परदेश सफरीसाठी हीन हेतू असल्याचा आरोप करत.

सरकारचा विरोध मुळात त्यांच्या परदेश सफरीत होणाऱ्या खर्चास नव्हता. कामाचा ध्यास घेणारा राजा सरकारला नको आहे असे अनेक विद्वानांचे मत होते.

अशा तऱ्हेच्या वादाच्या फेऱ्यात सापडलेल्या महाराजांना स्वतःच्या मुलांच्या शिक्षणाचे प्रश्नही भेडसावत असत. राजपुत्रांच्या शिक्षणासाठी त्यांनी टी. हार्वे या फ्रेंच शिक्षकाबरोबर काही सक्षम शिक्षकांची नेमणूक केली होती. भारतीय संस्थानांतील युवराजांनी ईटन किंवा हॅरो येथे राहून शिक्षण घेण्याचा प्रघात होता, पण आपल्या युवराजांना तेथे पाठवणे महाराजांना पसंत नव्हते. युवराजांनी इतर राजपुत्रांबरोबर बडोद्यास राहून ऑक्सफर्डच्या परिक्षेची तयारी करावी, असे त्यांचे मत होते. कारण 'श्रीमंत मुलांबाबतही अंगभूत धोके असतातच' याच संदर्भात 1898 मध्ये युवराज फत्तेसिंहरावांबरोबर गेलेल्या त्याच्या फ्रेंच शिक्षकास महाराजांनी लिहिले होते, ''फत्तेसिंहरावांना एवढ्यात नाचरेपणाची तालीम मिळावी असे आम्हाला अजिबात वाटत नाही. मुली, विशेषतः तरुणींशी लगट न करताही, राजपुत्रांना चांगल्या चाली-रीती शिकवता येतात...'' राजपुत्रांच्या हाती गरजेपेक्षा जास्त पैसा दिल्यास ते बिघडतील असे त्यांचे मत होते. म्हणून त्यांनी राजपुत्रांच्या खर्चाचे योग्य प्रमाण आखून दिले होते. वार्षिक चारशे पौंडाहून अधिक रक्कम त्यांना मिळणार नाही याकडे त्यांचे लक्ष असे. फत्तेसिंहरावांनी 1902 साली ऑक्सफर्डच्या कॉलेजात प्रवेश केला. पण तेथे नको अशा सवयी आणि संगतसोबत यांची जोड त्यांनी केल्यामुळे त्यांना परत बोलवणे भाग

पडले. जयसिंगरावांनी हॅरोला प्रवेश मिळवला होता, पण लवकरच त्यांना हार्वर्डला पाठविण्यात आले. तेथे त्यांनी 1912 साली पदवी संपादन केली. शिवाजीरावांनाही अभ्यासक्रम पुरा झालेला नसतानाच ऑक्सफर्डहून परत यावे लागले. सर्वात धाकटे धैर्यशीलराव काही काळ ईस्टबोर्न येथे राहिले आणि बडोद्याला आल्यावर त्यांना योग्यतेनुसार कामात गुंतवून टाकण्यात आले. राजकन्या इंदिराराजे या बडोद्याच्या कॉलेजमध्येच गेल्या आणि त्यांना अभिजात संस्कृत साहित्यात विलक्षण गोडी निर्माण झाली.

मुलांच्या शैक्षणिक प्रगतीत त्यांना समाधान नव्हते. एकूण त्यांच्या भाग्यात कौटुंबिक सौख्य लिहिलेले नव्हते. त्यांनी एका मित्राला एकदा सांगितले, ''मला कौटुंबिक जीवन असे कधी लाभलेच नाही. अगदी छोटीशी बाब सांगायची तर साधे चुंबन नाही-सलगी नाही-मला सर्वत्र मिळायचे ते सलाम! मी लहान होतो, तेव्हाही अशी परिस्थिती होती. विवाह होऊन अपत्ये झाल्यावरही महाराज म्हणून वावरण्यापेक्षा अन्य कोणत्या पद्धतीने कसे जगायचे, हे मला कळेनासेच झाले होते. माझी मुलेही मला सदान्‌सदा म्हणत, 'तुम्ही नेहमीच महाराज असता' त्यांच्या पालनपोषणासंबंधात मी कधीच कसूर केली नाही, तरी पण मला त्यांचा जिव्हाळा कधीच लाभला नाही!'' त्यांनी पुढे असेही म्हटले आहे, ''मनाला वाटेल त्यावेळी राजवाडा सोडून घरकुलात पुन्हा परत यावयाचे, अशा रीतीने जीवनाचे दोन अलग विभाग करता आले असते, तर मला बरेच काही साधता आले असते'' पण त्यांना ते शक्यच झाले नाही. बडोद्यात प्रारंभी त्यांना ज्या पद्धतीचे शिक्षण दिले गेले, त्यामुळे त्यांचा मूळचा हळवा संकोचीपणा वाढत गेला आणि हा अडसर दूर करण्याची शक्तीच त्यांच्या ठायी उरली नाही. वाढत्या वयाबरोबर त्यांना या गोष्टीचा त्रासही होई. त्यांच्या वरील उद्‌गारासंबंधी सार्जंट यांनी म्हटले आहे, ''अनेकानेक अडसर मोडून काढण्याचे धैर्य ज्या व्यक्तीने दाखविले, तिने दिलेली ही कबुली विचित्रच म्हटली पाहिजे'' [22] कारण विरोधी परिस्थितीला निश्चलपणे तोंड देणाऱ्या अनेक माणसांच्या बाबतीत हे असेच आढळते. वैयक्तिक संबंधाच्या बाबतीत पक्षघात झाल्यासारखे हे हतबल होतात, असेही त्याने पुढे नमुद केले आहे.

महाराजांच्या हयातीतच त्यांचे तीन पुत्र निधन पावले. राजकन्येने मातापित्यांच्या इच्छेविरुद्ध आपले लग्न केले आणि सयाजीरावांच्या हयातीतच ती विधवा झाली. राजपुत्र फत्तेसिंहराव यांचा विवाह

सातारा जिल्ह्यातील फलटण संस्थानातील राजकन्या पद्मावती यांच्याशी 4 फेब्रुवारी 1904 रोजी साजरा झाला. त्यांना दोन मुली आणि एक मुलगा झाला. लग्नास चार वर्ष पूर्ण झाली असताना, अनपेक्षितरीत्या त्यांना मेंदूचा आजार म्हणजे न्यूरायटिस झाला आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. फत्तेसिंहरावांचा अल्पवयीन पुत्र प्रतापसिंहराव यांस युवराज म्हणून घोषित करण्यात आले. 1903 साली सयाजीरावांचे खाजगी डॉक्टर आणि त्यांचे स्नेही बटुकराम कालवश झाले. मित्र अथवा कुटुंबीय यांचे सुख त्यांना फारसे लाभले नाही.

त्यांच्या स्वतःच्या कारकिर्दीस 1906 साली पंचवीस वर्षे पूर्ण झाली. रौप्यमहोत्सव थाटाने साजरा करण्याचा विचार सादर करण्यात आला. रौप्यमहोत्सव 5 ते 10 मार्च या काळात साजरा झाला. त्या निमित्ताने अनेक कार्यक्रमांचे सादरीकरण झाले. महोत्सवाची स्मृती म्हणून महाराजांचा अश्वारुढ पुतळा सार्वजनिक बागेसमोर उभारण्यात आला. आणि शहराच्या मध्यभागी असणारी नवी ज्यूबिलीबाग उभारण्यात आली. राजसिंहासन जुन्या सरकारवाड्यातून, लक्ष्मीविलास पॅलेसच्या 'इंदुमती महालात' प्रतिष्ठापित झाले.

1909 मध्ये महाराजांनी व्हाईसरॉय लॉर्ड मिंटो यांचे बडोद्यात शाही स्वागत केले. या निमित्ताने आनंदोत्सव साजारा करण्यात आला. यानंतर दिवाण रोमेशचंद्र दत्त आजारी झाले आणि त्यांचे निधन झाले. तोच पुढीलवर्षी 1910 मध्ये महाराजांचे मार्गदर्शक, तत्वज्ञ आणि परमस्नेही एफ. एच. इलियट यांचेही निधन झाले. पंचम जॉर्ज यांच्या राज्यारोहणाच्या कार्यक्रमासाठी महाराज इंग्लंडला गेले, ते परतले त्यावेळी संस्थान दुष्काळाच्या गर्तेत होते. तर दुसरीकडे प्रशासकीय अडचणी आणि कौटुंबिक अडचणींना तोंड देत होते.

युरोपहून परतल्यावर सयाजीरावांनी आपला पुत्र शिवाजीराव यांचा 1913 मध्ये विवाह केला आणि 1914 साली सयाजीराव आपल्या पत्नीसह पुन्हा युरोपला गेले आणि पहिल्या महायुद्धात सापडले. ऑस्ट्रियात अडकलेल्या चिमणाबाईंना वेस्ट इंडियन असल्याचा बहाणा करावा लागला. समग्र दुनियेत अशाश्वतता निर्माण झालेली असताना, ते डिसेंबर महिन्यात बडोद्यास परतले. या प्रसंगी चिमणाबाईंनी गोषाचा त्याग केला. एकाच गाडीत महाराजांच्या शेजारी बसून बडोद्याच्या राजरस्त्यावरुन त्या फिरताना दिसल्या. त्यांचे हे कृत्य अनेकांना मूकक्रांतीचे द्योतक वाटले.

सयाजीराव पुढील पाच वर्षे हिंदुस्थान सोडून बाहेर जाऊ शकले नाहीत. या संधीचा उपयोग त्यांनी संस्थानात आणि देशात दौरे करण्यासाठी केला. शिवाय 'नरेन्द्र मंडळ' स्थापन करण्याच्या प्राथमिक चर्चेत त्यांनी जातीने भाग घेतला.

महाराजांच्या राजनिष्ठेबद्दल वारंवार शंका घेतली जाई. महायुद्धाच्या रूपाने आपली प्रतिमा उज्ज्वल करण्याची त्यांना संधी लाभली. त्यांनी बत्तीस लाखांचे युद्धरोखे खरेदी केले आणि अडतीस लाखांच्या सरकारी प्रॉमिसरी नोटांचे युद्ध कर्जरोख्यांत रुपांतर केले. युद्धात आजारी पडून बरे झालेल्या सैनिकांच्या स्वास्थासाठी त्यांनी स्वतःचा मुंबईचा 'जयमहाल पॅलेस' सरकारला भेट दिला. युद्धप्रयत्नांसाठी केलेल्या साहाय्याबद्दल सयाजीरावांना जी.सी.आय.ई. (ग्रँड कमांडर ऑफ दि इंडियन एंपायर) हा किताब इ.स. 1918 च्या जानेवारी महिन्यात बहाल करण्यात आला. व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड यांनी पुढील वर्षाच्या मार्च महिन्यात बडोदे संस्थानाला अधिकृत पातळीवरची भेट दिली. त्या निमित्ताने गोयागेट येथे त्यांच्या हस्ते बडोदा राज्य रेल्वे कार्यशाळेचा शिलान्यास समारंभही साजरा झाला. काही अटी घालून संस्थानास ओखा मंडळाचा म्हणजे द्वारका आणि द्वारका बेट परिसराचा ताबा देण्यात आला. अफगाणिस्तानशी 1919 साली सरकारचा संघर्ष झाला. तेव्हाही महाराजांनी सरकारला शक्य ती मदत केली.

महायुद्धानंतर इ.स. 1919 च्या सप्टेंबरमध्ये महाराजांनी पुन्हा युरोपला जाण्याचे ठरविले. ते स्वतः आजारी असल्याने हवापालट हवी होती. शिवाय राजपुत्र जयसिंहराव तिथे आजारी असल्याने त्यांच्या बाबतीत वैद्यकीयदृष्ट्या अधिक काळजी घेण्याची गरज होती. युरोपला पोहोचल्यानंतर थोड्याच काळात, युवराज्ञी पद्मावतींनी देह ठेवला. या दुःखातून सावरण्यापूर्वीच राजपुत्र शिवाजीरावांचेही निधन झाले. महाराज स्वतः त्यावेळी दवाखान्यात उपचार घेत होते. स्वभावाच्या विशिष्ट ठेवणीमुळे सयाजीराव या दुःखातून लवकर बाहेर पडले.

दरवर्षी महाराज इंग्लंडला जात असत म्हणून तिथे निवासस्थाची सोय असावी म्हणून 1919 साली त्यांनी वॉटफोर्डजवळील रसेल्स इस्टेट आणि सरे परगण्यात ओल्ड्सवर्थ गावी एक बंगला घेतला. हा बंगला प्रसिद्ध कवी लॉर्ड टेनिसन यांच्या मालकीचा होता. ही व्यवस्था होताच युवराज(पौत्र) प्रतापसिंहाच्या शिक्षणाची तिथे व्यवस्था केली.

प्रिन्स ऑफ वेल्स एडवर्ड यांनी 1921 च्या नोव्हेंबरात बडोद्याला भेट दिली आणि महाराजांनी त्यांचे हार्दिक स्वागत केले.

1922 च्या मार्चमध्ये धैर्यशीलराव यांचा विवाह विमलाराजे यांच्याशी संपन्न झाला आणि महाराज पुन्हा युरोपला गेले. 21 डिसेंबरला त्यांचे जामात जितेन्द्रनारायण यांचे निधन झाले. आपल्या लाडक्या जावयास खांदा देण्याचा प्रसंग महाराजांवर आला. याच वेळी त्यांनी इटालीचा फॅसिस्ट नेता मुसोलिनी याची भेट घेतली होती. महाराजांना आणखी एक दुःखाची बातमी ऐकावी लागली. रेल्वेने बर्लिनहून पॅरिसला जात असताना राजपुत्र जयसिंह यांनी 27 ऑगस्ट 1923 रोजी गाडीतच देह ठेवला. नेमके नाव न देता ही बातमी वर्तमानपत्रातून छापून आली. गायकवाडांचा मृत्यू झाला, एवढीच नोंद असल्याकारणाने भलताच गोंधळ उडाला. महाराज निवर्तले असे सर्वांना वाटले. आणि वृत्तपत्रात त्यांच्या कारकिर्दीचा आढावा घेणारे सुंदर लेख छापून आले. सारी प्रजा सुन्न झाली. पण पुढे राजपुत्राच्या मरणाची बातमी कळली आणि प्रजेच्या मना निर्माण झालेली पोरकेपणाची भावना दूर झाली. स्वतःवरचे मृत्यूलेख वाचण्याचा एक वेगळा अनुभव महाराजांना लाभला.

इ.स. 1924 साली फ्रेंच शिक्षिका ठेऊन महाराजांनी फ्रेंच भाषा शिकायला सुरुवात केली. त्यांच्या ह्या कृतीवर मनसोक्त टीका झाली, पण लोकांच्या टीकेकडे दुर्लक्ष करुन ते फ्रेंच भाषा शिकत राहीले. त्याबरोबरच राज्यारोहणाचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्याच्या योजनेत ते मग्न होते.

इ.स. 1926 हे त्यांच्या राजवटीचे सुवर्णमहोत्सवी वर्ष होते. व्हाईसरॉय लॉर्ड रीडिंग व त्यांच्या पत्नी यांनी या वेळी बडोद्याला भेट दिली. या वेळी व्हाईसरॉयच्या हस्ते गोल्डन ज्यूबिली इन्स्टिट्यूट या इमारतीचा शिलान्यास झाला. त्याच वर्षी मार्च मध्ये एका वेगळ्या संस्थेची निर्मिती झाली. तिला 'पुअर हाऊस' नाव देऊन त्यांनी वृद्ध, अपंग व निराधार लोकांची सोय केली. मूकबधिर व अंधांसाठी वेगळी शाळा केली.

जीवनाच्या अखेरच्या टप्प्यात आपले जन्मगांव कवळाणे याचे स्मरण त्यांना झाले. 1926 च्या फेब्रुवारीत त्यांनी कवळाण्याला भेट दिली आणि भूतकाळाच्या आठवणीत रमून गेले.

महाराजांनी 4 जानेवारी 1929 रोजी पौत्र युवराज प्रतापसिंहाचा विवाह घोरपडे घराण्यांतील शांतादेवी या कन्येशी करुन दिला आणि ते पुन्हा युरोपला गेले. काही महिन्यानंतर व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन यांच्या स्वागतासाठी पुन्हा ते भारतात परत आले. आयर्विन यांची कारकीर्द राजकीय चळवळीच्या दृष्टीने धामधुमीची होती. 2 एप्रिल 1930 रोजी शांतादेवींनी राजपुत्र फत्तेसिंगराव यांना जन्म दिला आणि महाराज पणजोबा झाले.

सयाजीरावांनी 1933 व 1934 या वर्षी अमेरिकेला दोन भेटी दिल्या. 1933 साली शिकागो येथे भरलेल्या 'सर्व धर्म सहभाव' (फेलोशिप ऑफ फेथ्स) परिषदेचे त्यांनी अध्यक्षस्थान भूषविले. त्यांच्या तिथल्या भाषणाची सुजाणांनी अपार प्रशंसा केली. या भाषणात त्यांनी जीवनात धर्माचे स्थान आणि महत्त्व, हे मुद्दे मांडले.

1934 साली, कवळाणे येथे त्यांचे कनिष्ठ बंधू संपतराव निधन पावले. त्यांनी 1935 साली हीरक महोत्सवाचा सोहळा साजरा केला. हे भाग्य फार थोड्या लोकांना, राज्यकर्त्यांना प्राप्त झालेले आहे. या निमित्ताने त्यांना शेकडो मानपत्र मिळाली. त्यांचे अभिनंदन करण्यासाठी लॉर्ड विलिंग्डन तसेच लेडी विलिंग्डन बडोद्याला आल्या होत्या.

1936 मध्ये महाराज ऑलिम्पिक महोत्सवात उपस्थित राहाण्यासाठी बर्लिनला गेले. तिथे त्यांनी हिटलरची भेट घेतली. हिटलरने त्यांचे स्वागत केले. हिटलरबद्दल त्यांचे मत चांगले झाले. 1937 साली साम्राज्य परिषदेसाठी ते लंडनला गेले. या भेटीत 'क्रिकेट क्लब ऑफ इंडिया' या संस्थेचे आश्रयदाते बनले. नरेन्द्र मंडळाचे प्रमुखपद स्विकारण्याची त्यांना विनंती झाली पण प्रकृतीच्या कारणाने त्यांनी नम्र नकार दिला.

सन 1938 साली शांतादेवींना पुत्र झाला आणि त्याचे नाव रणजितसिंह ठेवले असल्याची बातमी महाराजांना कळली. परंतु त्यांचे कनिष्ठ चिरंजीव धैर्यशीलराव आजारी असल्याने त्यांच्या मनात काळजी होती. हिटलरने सुडेटन जर्मनांची बाजू घेतल्याने समग्र युरोपचे वातावरण दूषित झाले होते. युरोपच नव्हे समग्र जगच जागतिक युद्धाच्या खाईकडे लोटले जात होते. 31 ऑक्टोबर 1938 रोजी महाराज मुंबईत आले.

परत येताना सुद्धा त्यांची प्रकृती ठीक राहिलेली नव्हती. एकदा बोटीवर असताना महाराज अचानक पडले पण ताबडतोब सावरले. मुंबईस पोहोचेपर्यंत त्यांची प्रकृती ठीक राहिलेली नव्हती. आजार वाढला होता. त्यांना बडोद्याला नेणेही शक्य नव्हते. 1939 च्या फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीस त्यांच्या आजाराने गंभीर स्वरूप धारण केले. त्यांना बाहेरुन रक्ताचा पुरवठा करावा लागला. डॉक्टर सतत त्यांच्याजवळच असत. पण उपचारांना प्रतिसाद मिळत नव्हता. 6 फेब्रुवारी 1939 रोजी वयाच्या 76व्या वर्षी महाराजांचे निधन झाले.

## उ) ब्रिटिश सत्तेशी संघर्ष :

सयाजीराव महाराजांना अधिकार प्राप्त झाल्यापासून इ.स. 1939 पर्यंत त्यांनी साठ वर्षांहून अधिक राज्यकारभार केला. ह्या काळात ब्रिटिशांच्या तथाकथित पुढारलेल्या राज्यांतहि जी आधुनिकता व सर्वस्पर्शी सुधारणा दिसून आली नाही ती त्यांनी एकट्याच्या बळावर घडवून आणली. अधिकार प्राप्तीच्या वेळेस त्यांना दोन प्रकारचे संकेत देण्यात आले होते. एक म्हणजे ब्रिटिश साम्राज्याशी राजनिष्ठा कायम ठेवणे आणि दुसरी म्हणजे पुण्याच्या 'सार्वजनिक सभे' कडून त्यांना महाराष्ट्राची आनबान जागृत ठेवण्यासंबंधीचा आदेश. ह्या दोन विरोधी गोष्टींचा ताळा बसविणे असंभवच होते. ह्या दोन असंभव गोष्टी साधण्यातच त्यांचे सारे आयुष्य गेले. मराठी आनबान याचा अर्थ आपल्या न्यायोचित अधिकारांना सुरक्षित ठेवणे, निष्ठेने प्रजेचे कल्याण करणे आणि एक आदर्श राज्य म्हणून बडोद्याचा लौकिक करणे. हे सर्व करताना इंग्रजी सत्तेशी राजनिष्ठा ठेवणे हे आलेच! ही राजनिष्ठा पण प्रत्येक इंग्रजी अधिकाऱ्यांच्या मिजासावर अवलंबून होती. वाईसरॉय आणि मुंबईचा गव्हर्नर तसेच गुजरात मध्ये विभिन्न पदांवर येणारे इंग्रज अधिकारी कमिशनर, पोलिस अधिकारी, इ. लोकांशी सयाजीरावांचा नेहमी संबंध येत असे. दोन्ही पक्ष्यांमध्ये बऱ्याच वेळेस राजकीय विषयांवरील विचारांमध्ये साम्य होत नसे. इंग्रज अधिकाऱ्यांची वृत्ती देशी राज्यांना निर्माल्यवत् करून त्यांच्यावर आपला आदेश लादणे अशी होती, जी कुठल्याही स्वाभिमानी सत्ताधीशाला स्वीकार्य नसणारच !

महाराजांचे राज्य गुजरात मध्ये होते आणि तेही विखुरलेले ! पालनपुर, द्वारका, बिलिमोरा, ह्या त्रिकोणात गायकवाडी राज्य तसेच अहमदाबाद, खेडा, सूरत इ ब्रिटिश राज्यान्तर्गत जिल्ह्यांची सर्वत्र खिचडीच

होती. त्यामुळे पोलीस व्यवस्था, अपराध आणि जकातीसंबंधी/बाबतीत अनेक संघर्ष होत असत. महाराजांना राज्याधिकार मिळण्यापूर्वीच राज्याच्या मीठा संबंधीचे तसेच पोस्टा संबंधीचे एक एक करून सारे हक्क ब्रिटिशांनी हस्तगत केले होते. त्यामुळे पहिल्यापासूनच महाराजांचे मन कलुषित झाले होते. ह्याचा परिणाम असा झाला की वेळ येताच त्यांच्यात इंग्रजांच्या ह्या दुर्व्यहाराला प्रतिकार करण्याची वृत्ती जोर करत गेली. एलियटने त्याला समर्थन दिले. त्यामुळे रेसिंडेटाचे काहीच चालले नाही. पुढे नंतर जेव्हा सेडन दिवाणपदावर आले तेव्हा रेसिडेंट कॉवचे काहीच चालले नाही. समर्थ बापट, श्रीनिवास राघवायंगर, बाबू अरविंद घोष, धामणकर, पेस्तनजी दोराबजी यांसारख्या तरुण विद्वान अधिकाऱ्यांना सोबत घेऊन वेळोवेळी त्यांच्याशी सल्ला-मसलत करुन एक एक काम तसेच सुधारणा कार्यांना अंतिम रूप देण्याचे कार्य त्यांनी सुरु केले. ह्या अधिकारी वर्गात पुढे जाता त्यांनी रमेशचंद्र दत्त, सेडन, व्ही. टी कृष्णमचारी, व्ही.पी. माधवराव इ. नामांकित लोकांना आपल्याकडे नोकरीत ठेवले. अशा तऱ्हेने आपल्या राज्याच्या प्रगतीच्या दृष्टीने सयाजीराव एक एक पाऊल पुढे टाकत होते. आणि सावधपूर्वक व्यवहार करीत होते. ह्याच सुमारास कर्जनशाहीचा उदय झाला. कर्जन भारतात सन् 1889 ते 1905 ह्या काळात गव्हर्नर जनरल म्हणून कार्यरत राहिला.

सयाजीराव महाराजांच्या मनात सतत एक विचार सदैव जागृत राहत होता की मी समस्त हिंदी राष्ट्राचा एक घटक असल्याकारणाने देशी नरेश असलो तरी त्यापासून काही वेगळा नव्हे. त्याचमुळे राष्ट्रोद्धाराचे थोडे बहुत दायित्व माझ्यावर सुद्धा आहे. सर्वांनीच राष्ट्रोद्धाराच्या कार्यात समानरुपाने एकत्र आले पाहिजे. ब्रिटिश सत्ताधिश महाराजांच्या ह्या विचारसरणीच्या अगदी विरुद्ध होते. रेसिडेंटचे म्हणणे असे की, 'महाराजांनी केवळ आपल्या पर्यंतच सीमित राहिले पाहिजे महाराजांनी ही गोष्ट कधीच आवडली नाही. छोट्या छोट्या गोष्टींवरुन भेदा भेद कायम ठेवून फूट पाडणे तसेच अखेरीस राजा प्रजा यांना पराभूत करणे हीच इंग्रजांची कूटनीति होती. महाराजांना हे केव्हाच लक्षात आले होते. इंग्रजांची इच्छा अशी होती की महाराजांनी दादाभाई नवरोजी, टिळक, सुरेन्द्रनाथ बॅनर्जी सारख्या लोकांना कधीच साथ सहकार देऊ नये. जे लोक राष्ट्रीय कार्यासाठी तयार आहेत त्यांच्या विचारांना समर्थन देऊ नये, तसेच मुंबई-पुणे इत्यादि ठिकाणी होणाऱ्या सामाजिक परिषदांमध्ये अध्यक्षस्थान स्वीकारु नये. ह्याच वर्षी नॅशनल कॉग्रेसच्या अधिवेशनांमुळे देशात

एक जागृतीची लाट र्निमाण झाली. देशी राज्यांनी पण सरकार समोर अशी फिर्याद केली की लोक राजनीतिमध्ये सुधारणा आणि आपल्या अधिकाराची मागणी करू लागले आहेत. रेल्वे मार्ग बनविणे, तलाव बांधणे, चोरी लूटफाट यांवर रोख ठेवणे या प्रत्येक कामांच्या निमित्ताने महाराजांचा संबंध पावलोपावली इंग्रज अधिकाऱ्यांबरोबर येऊ लागला, त्यामुळे त्यांना चारही बाजूंनी प्रतिबंध सहन करावा लागला. महाराजांचे मन त्यामुळे विषण्ण झाले.

सन् 1896-97 साली आलेल्या प्लेगच्या प्रचंड प्रकोपामुळे पुढची दहा-बारा वर्षे त्याची काळजी घेण्यात गेले. पुण्यात कलेक्टर रेंड व ले. आयर्स्ट चा खून करण्यात आला. त्यामुळे एक नवीन प्रकारचे संकट उद्‌भवले. लोकांमध्ये भयाचे वातावरण निर्माण झाले. अशा वेळेस इंग्रजी वर्तमानपत्रांतून अशा बातम्या येऊ लागल्या की सयाजीराव मनापासून इंग्रजांच्या बरोबर नाहीत. ते कोणताच सहयोग देत नाहीत. त्यातून अशी प्रतिक्रिया उमटू लागली की महाराज 'राजद्रोही' आहेत. अशा परिस्थितीमध्ये महाराजा आपल्या स्वास्थामुळे आणि अशाच कारणांमुळे वारंवार युरोपला जाऊ लागले होते. फ्रांस, जर्मनी, अमेरिका, इ. देशांमध्ये जाऊन जसे ते हिंदी राष्ट्राच्या प्रगतीसाठी उपाय योजना करु लागले, इंग्रजांना त्यामुळे अतिशय कष्ट होऊ लागले. 'केसरी' मध्ये निरंतर महाराजांचा गौरव प्रकट होऊ लागला. हे कारण सुद्धा ब्रिटिशांच्या मनात अढी निर्माण करणारे होते. पॅरिसला जाऊन महाराजांनी फ्रेंच प्रेसिडेंट अथवा जर्मनीच्या केसर महाराजांची भेट घेतली, अमेरिकेत राहून कधी त्यांनी प्रेसिडेंटची भेट घेतली तरी इंग्रज समजत की सयाजीराव आपल्या ब्रिटिश साम्राज्याला मोडून पाडण्यास प्रयत्नशील आहेत.

सन् 1900 मध्ये कर्जनने सयाजीरावांना आपल्या समोर झुकविण्याचा प्रयत्न केला. हिंदुस्थानातील दुष्काळासंबंधी माहिती घेण्यासाठी कर्जनने जाणून बुजून बडोद्याचा दौरा करण्याचे ठरविले. ह्या वेळी महाराज महाराणी चिमणाबाईंची शल्यक्रिया करण्यासाठी युरोपला गेले होते. कर्जनने तार पाठवून महाराजांना बडोद्यात उपस्थित राहण्यासंबंधी कळविले. महाराजांना ते शक्य नसल्याकारणाने त्यांनी आपल्या दिवाणांना पत्राद्वारे आपण न येण्याचे कळविले. व कर्जनचा यथायोग्य सत्कार करण्याचे आदेश दिले. कर्जनने एक विक्षिप्त परिपत्रक काढून देशी राजांमध्ये एक प्रकारचे भय निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

ह्या परिपत्रकात असे लिहिले होते की "भविष्यात जो कोणी राजा राज्य सोडून कुठेही बाहेर जाऊ ईच्छित असेल तर त्याला सार्वभौम सरकारची पूर्व-अनुमति घ्यावी लागली."

हिंदुस्थान हा एकात्म आणि अविभाज्य असून 'स्वदेशी' ची संकल्पना ही राष्ट्र उभारणीची खरी शक्ती आहे, अशी सयाजीरावांची धारणा होती. 29 मार्च 1901 रोजी मुंबईच्या ग्रॅंट मेडिकल कॉलेजच्या बक्षीस समारंभात भाषण करताना महाराज म्हणाले, "आपण कितीही विभक्त असलो, तरी आपल्या दैवानेच आपल्याला एकत्र बांधून ठेवले आहे. जात, धर्म किंवा लिंग असा कसलाही भेद न करता विद्यार्थ्यांना प्रवेश देणाऱ्या आणि लोक शिक्षणचे कार्य करणाऱ्या त्या महाविद्यालयाची त्यांनी प्रशंसा केली." [23]

देशाचे औद्योगिकीकरण व्हावे यावर महाराजांच्या दृढ विश्वास होता. आपले अनेक उद्योगधंदे परक्यांच्या हातात आहेत त्यामुळे ते अस्वस्थ असत. आपले सारे लोहमार्ग परकीय भांडवलावर बांधले गेले आहे हे त्यांनी निदर्शनास आणले होते. 1902 च्या डिसेंबर मध्ये अहमदाबादला राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाच्या जोडीने भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना त्यांनी आपले विचार मांडले होते. राष्ट्रसभेशी संबंधित एका समारंभात एका संस्थानिकाची उपस्थिती हे एक धाडसाचेच निदर्शक होते. आपल्या भाषणात रोमेशचंद्र दत्त यांच्या "इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडिया" या ग्रंथावर आधारित अनेक मुद्दे मांडले. प्रत्येक उद्योगपती केवळ स्वसमाजासाठीच नव्हे, तर उभ्या देशासाठी झटत आहे, अशी व्यापक चळवळ या राष्ट्रात उभी राहिलेली पाहण्याची आपणास मनोमन इच्छा आहे असेही महाराजांनी सांगितले. भाषणाच्या अखेरीस तेथे जमलेल्या राष्ट्रनेत्यांना त्यांनी इशारा दिला की, त्यांचे अपयश हे साऱ्या देशाचे अपयश होय, असे समजण्यात येईल म्हणून जे काही करायचे ते अतिशय दक्षतेने करावयास हवे. एका जागृत संस्थानिकाचे हे देशभक्तिपर उद्गार ब्रिटिश नोकरशाहीच्या दृष्टीतून निसटणे शक्य नव्हते.

1903 साली लाहोरचा दयानंद अँग्लो-वेदिक कॉलेजात भाषण करीत असताना तसेच काश्मीरमधील एका मदरशात बोलताना त्यांनी हिंदू आणि मुसलमान या दोघांचेही राष्ट्रीयत्व एकच होय, असे मत मांडले होते. राष्ट्रीयत्व आणि समता या संकल्पनांचा विस्तार करताना बडोदा कॉलेजमधील एका भाषणात आपण

लोकशाहीच्या बाजूचे आहोत, असेही त्यांनी जाहीर केले. राष्ट्रीय सभेत दुफळी पडत असताना त्यांनी असे उद्‌गार काढलेले होते.

1907 सालच्या सुरत अधिवेशनात टिळकांसारख्या नेतृत्वाखाली जहाल गटाने मवाळांची फार मोठी पंचाईत केली होती. टिळकांनी मवाळ नेतृत्वावर विदारक हल्ले चढविले आणि त्यांचे नेतृत्व उलथून टाकले. काळाची पावले ओळखली नाही, तर इंग्रजांना तसेच हिंदी संस्थानिकांना नव्या लोकशाहीच्या जमान्यात यत्किंचितही स्थान राहणार नाही, याची पूर्वकल्पना सयाजीरावांना आलेली होती. दुसरीकडे क्रांतिकारकांच्या दहशदवादी चळवळीचा दबाव वाढत होता आणि तो काबूत आणण्यासाठी हिंदुस्थान सरकार कडक उपाययोजना करीत होते. आणि त्यासाठी सरकारने हिंदी संस्थानांचे सहकार्य मागितले होते. या संबंधात लॉर्ड मिंटो यांनी महाराजांना 6 ऑगस्ट 1908 रोजी पत्र लिहिले. या पत्रात असे म्हटले होते की, देशी संस्थानात राजद्रोही लोक मूळ धरू पाहत आहेत, यात बिलकूल संशय नाही. हिंदुस्थान सरकारला हे लोक तेथून त्रास देऊ शकतील. तेव्हा अशा चळवळींना पायबंद घालण्याच्या दृष्टीने आजच्या इतकी गंभीर परिस्थिती पूर्वी कधीच निर्माण झालेली नव्हती. म्हणून 'या प्रश्नाबाबत खुली व स्नेहपूर्व वातावरणात पुरेशी चर्चा करण्यासाठी' तसेच या प्रकारच्या चळवळींचा देशी संस्थानातून शिरकाव होऊ नये यासाठी कोणती कारवाई करता येईल, या विषयी विचारविनिमय करण्यासाठी व्हाइसरॉय साहेबांनी महाराजांना बोलावून घेतले. त्यांच्या पत्राला 19 नॉव्हेंबर 1909 रोजी सयाजीरावांनी उत्तर पाठविले, त्यावर ब्रिटिश नोकरशाहीच्या वर्तुळात बरेच गंभीर आक्षेप घेतले गेले. महाराजांच्या म्हणण्याप्रमाणे उभयविध सरकारांचे हितसंबंध समान असल्याने एकविचाराने कारवाई करण्यात यावी या विचाराशी आपण पूर्णपणे सहमत आहोत, पण इतर संस्थानांतून राजद्रोही चळवळी सुरु असल्याची माहिती आपणास नाही, तसेच तशी माहिती मिळविण्याचे त्यांनी केलेले प्रयत्न अयशस्वी झाल्याचे त्यांनी हिंदुस्थान सरकारला सांगितले. त्या बरोबरच 'अराजक आणि राजद्रोही' दडपून टाकण्यासाठी जे रास्त सहकार्य व साहाय्य मागितले जाईल ते देण्यास आपण मनोमन तयार आहोत, असेही स्पष्ट केले.

महाराजांच्या या उत्तरा संबंधीच्या वार्ता ताबडतोब अनेक वर्तमान पत्रातून प्रसिद्ध झाल्या. सर व्हॅलेंटाईन चिरोल यांनी आपल्या 'इंडियन अनरेस्ट' या पुढे प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात या विषयी उल्लेख केला

आहे की, गायकवाडांच्या उत्तरात "फार मोठे विरोधी मतप्रदर्शन नाही, पण त्यात एक प्रकारचा थंडपणा होता, त्यामुळे राष्ट्रीय पत्रांनी वाहवा केली..."[24] कलकत्याच्या 'अमृत बझार पत्रिके' ने या बाबत सरळ व धिटाईची भूमिका घेतल्याबद्दल सयाजीरावांचे अभिनंदन केले होते. परिणामी हिंदुस्थानातील नोकरशाहीने असा निष्कर्ष काढला की महाराजांची जहाल राष्ट्रवाद्यांना आतून फूस आहे. परिणामी अल्पावधीतच त्यांना मानहानी सहन करावी लागली.

आपल्या संस्थानात एखादा राजद्रोही कट चालू आहे काय, ते शोधण्यासाठी, सयाजीरावांनी चौकशी करविली पण त्यात असे आढळून आले की, स्वदेशीची चळवळ, गोरक्षणाचा प्रचार आणि राष्ट्रीय शिक्षणाचे प्रयोग या उपक्रमांखेरीज राज्यात कसलीच गंभीर घटना घडलेली नाही.

1907 साली नर्मदेच्या काठी चांदोद या गावी एक संस्था स्थापन झाली. तिच्या परिसरात गंगानाथाचे शिवमंदिर असल्याने तिला, 'श्री गंगानाथ भारतीय सार्व विद्यालय' असे नाव देण्यात आले होते. हे विद्यालय श्री केशवराव देशपांडे यांच्या कडून चाललेले होते आणि श्री देशपांडे हे अरविंद घोषांचे घनिष्ठ मित्र होते. अरविंद घोष हे एकेकाळी सयाजीरावांचे खाजगी चिटणीस होते. उत्तरकाळात जगप्रसिद्ध कीर्तीचे योगी म्हणून प्रसिद्ध झाले. अरविंद तेव्हा कॉलेजात प्राध्यापक असून बडोदे राज्यात त्यांनी सरकारी उच्च पदावर काम केलेले होते. गंगानाथ विद्यालयात मामासाहेब फडके आणि काकासाहेब कालेलकर तसेच पुढे नाशिक कटाच्या खटल्यात गोवले गेलेले विठ्ठल जोशी आणि वामन दातार यांच्यासारखे शिक्षक होते. बरोडा रेसिडेंसीला या विद्यालयात 'राजद्रोही' परंपरा जोपासली जात असल्याचा संशय आला. बडोदे संस्थानावर काही आरोप होऊ शकतील या शक्यता टाळण्यासाठी इ.स. 1911 साली ही संस्था बंद करण्यात आली. लॉर्ड मिंटो यांनी 1909 साली अहमदाबादला जेव्हा भेट दिली, तेव्हा त्यांच्या गाडीवर एक बॉम्ब फेकला गेला. बडोदे हे अनेक क्रांतिकारकांचे गुप्त आश्रयस्थान आहे, असा त्या काळी संशय होता. ह्या संबंधी असे म्हटले जात होते की हा बॉम्ब बडोद्यात बनविला होता. ब्रिटिश पोलीसांची अशी फिर्याद होती की बडोद्यात खूप ठिकाणी अशा तऱ्हेचे बॉम्ब, बनविले जातात. बडोदे रेसिडेन्सीच्या हाती 'वनस्पतीनी दवाओ' या नावाची एक गुजराती पुस्तिका आलेली होती. बॉम्ब कसे तयार करावेत याची माहिती देणाऱ्या ह्या पुस्तकाला

असे फसवे नाव देण्यात आले होते. बडोदे सरकारचा एक कर्मचारी नरसिंहभाई पटेल हा ह्या पुस्तकाचा लेखक होता. अरविंद बाबू घोष यांच्या 'मुक्ती कोन पथे', 'वुईच वे फ्रीडम' या बंगाली पुस्तकाच्या गुजराती भाषांतराच्या प्रकाशनाचे काम ह्या नरसिंहभाईनीच केले होते. बडोदे प्रशासनाला ह्या वस्तुस्थितीची नीट माहिती नव्हती. ती मिळताच चौकशी चालू झाली. ही चौकशी होत असतानाच मुंबई सरकारच्या एका अधिकाऱ्याने नवसारी येथे प्रत्यक्ष धाड घालून एका विहिरीतून अरविंद कृत सदर पुस्तकाच्या गुजराती भाषांतराच्या पाचशे प्रती हस्तगत केल्या होत्या. रेसिडेंटच्या समाधानासाठी नरसिंहभाईला हद्दपार करणे महाराजांना भाग पडले.

याच काळात आणखी एक प्रकरण घडले. त्यात दोन महाराष्ट्रीय व्यक्तींना गोवण्यात आले. आनंदराव आणि माधवराव हे दोघेजण परवान्यावाचून गायकवाडी संस्थानातील दक्षिण गुजरातमधील बिलिमोरा या शहरी युगांतर नावाचा छापखाना चालवीत होते. त्याची माहिती मिळताच प्रशासनाने त्यांच्या विरुद्ध योग्य ती कारवाई केली.

अशा उच्चस्तरीय तसेच सामान्य व्यक्तिंशिवाय रेसिडेंन्सीला खुद्द महाराज सयाजीराव यांचा संशय होता. परंतु त्यांच्या विरुद्ध एकही पुरावा सिद्ध करता आला नाही. केशवराव देशपांडे आणि खाशेराव जाधव यांना संस्थानी नोकरीतून काढून टाकण्याबद्दल रेसिडेन्सीने दडपण आणले. महाराजांना त्रास होऊ नये म्हणून देशपांडे यांनी स्वतःहून राजीनामा दिला. आपले स्नेही आणि प्रशासनातील अधिकारी यांच्या पाणउताऱ्यापेक्षा रेसिडेंटच्या सततच्या हस्तक्षेपाचा त्यांना विशेष संताप येई. आणि यात आणखी संस्थानातील राजद्रोही चळवळी विरुद्ध कडक कारवाई केली जाईल, अशा आशयाची अधिसूचना काढण्याचा सल्ला रेसिडेंसीने महाराजांना दिला.

महाराजांनी आपल्या राजनिष्ठेविषयी कितीही खुलासा सादर केला असला तरी त्यांच्यावर ब्रिटिश सरकारी अधिकाऱ्यांनी 'राजद्रोह्यांचे आश्रयदाते' असाच शिक्का मारलेला होता व बडोदे संस्थान हे क्रांतिकारकांचे गुप्त आश्रयस्थानच आहे असे त्याचे मत होते.

याच पार्श्वभूमीवर सयाजीराव महाराजांवर आणखी एक प्रसंग ओढावला. हा प्रसंग म्हणजे 1911 च्या डिसेंबरमध्ये घडून आलेले दिल्ली दरबार प्रकरण ! या प्रकरणी बादशाह व राणीसाहेब यांच्याकडे पाठ फिरवून शाही पाहुण्यांचा जाणूनबजून अपमान करणे तसेच राणीसाहेबांपुढे न वाकून त्यांच्याविषयी आदरभावना प्रकट न करणे, असे आरोप सयाजीरावांवर करण्यातआले. लंडन तसेच इंग्लंडमधील इतर राष्ट्रीय पत्रांनी हा प्रसंग मुख्य धरून खोट्या आरोपांचे पद्धतशीरपणे जाळे विळण्याची एक मोहीमच सुरु ठेवली.

गायकवाडांनी हा जो जाणूनबजून अविवेकीपणा दाखविला आणि स्वतःवर जी नामुष्की ओढवून घेतली, ती एक त्यांना झणझणीत इशारा ठरो, अशी आशाही ब्रिटिश वृत्तपत्रांनी प्रदर्शित केली होती.

एकानंतर एक अनेक व्हाइसरॉय आले, त्या सर्वांना एकटे सयाजीराव तोंड देत होते. त्या सर्वांना तोंड देण्यासाठी ते समर्थ होते. इंग्रज सत्ताधीश महाराजांना काही करूनही कमीपण देण्यासाठी सतत प्रयत्नशील राहात. महाराजांचा उद्देश समस्त राष्ट्रच्या विकासाशी जोडलेला होता. त्यामुळे त्यांची दृष्टी केवळ बडोद्यापुरतीच सीमित राहिली नाही. बंग-भंग आंदोलनाच्या वेळी बाबू अरविंद घोष बडोदा सोडून गेल्यावर, त्यांच्या जागी प्रसिद्ध रमेशचंद्र दत्त यांना त्यांनी आपल्या राज्याच्या सेवेत घेतले. ह्या कारणाने इंग्रज त्यांच्यावर रुष्ट होते. श्री दत्तांच्या मदतीने महाराजांनी आपल्या राज्यात नवीन सुधारणा करण्यास सुरुवात केली. आपल्या राज्यातील प्राथमिक शाळेत त्यांनी हिंदी भाषेची सुरुवात केली. त्यांच्या दृष्टीने एक भाषा राष्ट्रीय एकतेसाठी प्रमुख साधन होईल.

1909 साली बडोद्यात महाराष्ट्र साहित्य संमेलन सुरू झाले. ह्या संमेलनाचे मुख्य संचालक श्री दत्त होते. ह्या संमेलनात ज्या विद्वानांचा विचार विनिमय झाला असा क्वचितच कुठे झाला असेल. डॉ. कीर्तिकर आणि डॉ. भांडारकर या संमेलनाचे अध्यक्ष होते इतर विद्वानांमध्ये हरप्रसाद शास्त्री, मदनमोहन मालवीय, यदुनाथ सरकार इ. नावे उल्लेखनीय आहेत. या सर्व विद्वानांचे तीन दिवस एकत्र येऊन चर्चा करणे, यामुळे सर्वांना असा आभास होऊ लागला की महाराज राष्ट्रीय एकता निर्माण करीत आहेत. जो स्वातंत्र्य युद्धाच्या दृष्टीने पहिले पाऊल होते. महाराजांच्या प्रेरणेने अशी कित्येक संमेलने वारंवार बडोद्यात आयोजित होत

राहिली. मराठी शिक्षण परिषद, गुजराती साहित्य परिषद, ओरिएन्टल कांन्फ्रेंस सारख्या संस्थांना मार्गदर्शन करण्याचे महत्त्वाचे कार्य महाराज सतत करीत राहिले. सयाजीरावांच्या सार्वत्रिक ख्यातीमुळे इंग्रजांमध्ये अतिशय रोष उत्पन्न होत होता.

आपल्या संस्थानात हंसस्वरूप स्वामी, रविंद्रनाथ टागोर, मार्क ट्वेन, क्लिप्लिंग सारख्या विद्वानांची व्याख्याने ठेवणे, तसेच पुण्याच्या अनेक अग्रगण्य व्यक्तींना उदा. नरसोपंत केळकर, विजापूरकर, हिंगण्याचे अण्णाभाऊ कर्वे, पांगारकर, प्रो. भानु, आहिताग्नि राजवाडे व विसूभाउ राजवाडे यांना सतत ते आश्रय देत राहिले.

✪ ✪ ✪ ✪ ✪

# संदर्भ टीपा (प्रकरण-1)


1. दाजी नागेश आपटे, श्री महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे चरित्र, खंड 1ला (इ.स. 1863-1887) 1936, पृ.क्र. 5.
2. य. रा. दाते, श्री सयाजी गौरवग्रंथ, 1933 , पृ क्र. 2.
3. वि. गो. खोबरेकर, गुजरातेतील मराठी राजवट (1664-1820) राजहंस प्रकाशन, पुणे. 1962, पृ.क्र. 27.
4. व्ही. के. चावडा, सयाजीराव गायवाड, अनु. स. गं. मालशे, 1987, पृ. क्र. 4.
5. व्ही. के. चावडा, सयाजीराव गायवाड, अनु. स. गं. मालशे, 1987, पृ. क्र. 5.
6. य. रा. दाते, श्री सयाजी गौरवग्रंथ, 1933 , पृ क्र. 7.
7. G.H. Desai & A.B. Clarke, Baroda Gazetter, Vol. I, 1923, Page 429-30.
8. व्ही. के. चावडा, सयाजीराव गायकवाड, अनु. स. गं. मालशे 1987, पृ.क्र. 10
9. व्ही. के. चावडा, सयाजीराव गायकवाड, अनु. स. गं. मालशे 1987, पृ.क्र. 12
10. Stanley Rice, Life of Sayajirao III, Maharaja of Baroda Vol II, Page 264
11. स्मिता भागवत, अविनाश कप्तान, इये सयाजीचिये नगरी, 2004, पृ.क्र. 12
12. व्ही. के. चावडा, सयाजीराव गायकवाड, अनु. स. गं. मालशे 1987, पृ.क्र. 17
13. व्ही. के. चावडा, सयाजीराव गायकवाड, अनु. स. गं. मालशे 1987, पृ.क्र. 17
14. Raja Sir T. Madhava Rao, K.C.S.L., Minor Hints, Lectures Delivered to Maharaja Gaekwar Sayajirao III, Page 215,220.
15. व्ही. के. चावडा, सयाजीराव गायकवाड, अनु. स. गं. मालशे 1987, पृ.क्र. 21
16. स्मिता भागवत, अविनाश कप्तान, इये सयाजीचिये नगरी, 2004, पृ.क्र. 28
17. स्मिता भागवत, अविनाश कप्तान, इये सयाजीचिये नगरी, 2004, पृ.क्र. 32

18. G.H. Desai & A.B. Clarke, Baroda Gazettzer, Vol. II, 1923, Page 310-11

19. स्मिता भागवत, अविनाश कप्तान, इये सयाजीचिये नगरी, 2004, पृ.क्र. 53

20. व्ही. के. चावडा, सयाजीराव गायकवाड, अनु. स. गं. मालशे, पृ.क्र. 58

21. व्ही. के. चावडा, सयाजीराव गायकवाड, अनु. स. गं. मालशे, पृ.क्र. 58

22. Philip W. Sargent, The Ruler of Baroda, 1928, Pa. 77

23. स.व.प्र. दामोदर सांवळाराम आणि कंपनी, श्रीमन्महाराज सयाजीराव महाराज यांची भाषणे(प्र.ख.) 1936, पृ.क्र. 32, 49.

24. व्ही. के. चावडा, सयाजीराव गायकवाड, अनु. स. गं. मालशे, 1987 पृ.क्र. 77

✪ ✪ ✪ ✪ ✪